# संपादकीय

## नवे ग्रंथप्रेमी मुख्यमंत्री

महाराष्ट्राचे बाविसावे मुख्यमंत्री म्हणून सुशीलकुमार शिंदे यांनी सूत्रे हाती घेतली आहेत. एक ग्रंथप्रेमी व्यक्ती मुख्यमंत्री झाली याचा आम्हाला अभिमान वाटतो. त्यामुळे त्यांचे विशेष अभिनंदन करावेसे वाटते. सुशीलकुमार शिंदे यांचे मराठी पुस्तकांचे वाचन अद्ययावत असते. बऱ्याच नव्या लेखकांशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत. दमाणी पुरस्कार समितीचे ते अनेक वर्षे अध्यक्ष आहेत आणि त्या पुरस्कार समारंभाला ते सहसा कधी गैरहजर नसतात. त्यांचा ग्रंथसंग्रह हेवा वाटण्याजोगा आहे. मराठी पुस्तके, प्रकाशक व लेखक कवी याबद्दल त्यांच्याकडे अत्यंत ताजी माहिती असते. दूर दिल्लीत असतानाही मराठी लेखक-प्रकाशकांशी ते संपर्क ठेवून असत. अशा ग्रंथप्रेमी व्यक्ती राज्यसत्ता चालवतात, तेव्हा ग्रंथव्यवहाराला चैतन्य देणाऱ्या उपक्रमांनाही चालना मिळेल अशी खात्री वाटते. यशवंतराव चव्हाण, शरद पवार, मनोहर जोशी यांच्या सारख्या ग्रंथप्रेमी मुख्यमंत्र्यांमुळे महाराष्ट्रातील जनतेची साहित्यकलाविषयक आस्था आणि अभिरुची चोखंदळ होण्यास मदत झाली आहे. ना. सुशीलकुमार शिंदे यांच्या कारकीर्दीतही तिला उधाण यावे. सुशीलकुमार शिंदे यांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

## कऱ्हाड संमेलनाची फलश्रुती

कऱ्हाड येथील ७६वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन हे गावकऱ्यांच्या प्रचंड गर्दीमुळे गाजले. अविस्मरणीय ठरले. कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमावर नदीच्या पात्रात भर घालून उभारलेल्या भव्य मंडपात हे संमेलन झाले; किलोमीटर लांबीची ग्रंथदिंडी आणि दहा परिसंवाद(त्यातला एक रद्द), दोन कविसंमेलने, (शिवाय कविकट्टा), बालमेळावा, बाबामहाराज सातारकरांचे प्रवचन, श्री पु भागवतांची (आणि ऐनवेळी झालेली) आशुतोष गोवारीकरांची मुलाखत, आणि (अनधिकृत) सुरेखा पुणेकरांचे लावणी-दर्शन- अशा भरगच्च कार्यक्रमांनी इकडे जाऊ का तिकडे - अशी श्रोत्यांची गोची झाली. पुस्तकांचे दोनशे स्टॉल्स - हाही एक उच्चांकच ! स्टॉलची मांडणी सर्व स्टॉल्स एका नजरेत दिसावेत या दृष्टीने एल किंवा यू आकाराची सर्वसाधारणपणे करतात; येथे ती समांतर सात आळींमध्ये केल्याने काही स्टॉलकडे वाचकग्राहकांचे पाय वळलेच नाहीत.. परंतु एकूण पुस्तक विक्री चांगली झाली असावी. संमेलनाचे आयोजन काळजीपूर्वक केले होते. खूप कार्यकर्ते व स्वयंसेवक होते. परंतु साहित्यिकांना जाणणारे फारसे कोणी त्यात नव्हते. त्यामुळे आगतस्वागतात केवळ औपचारिकपणा होता. अर्थात 'कराड जिमखाना'सारख्या संस्थेकडे आयोजनाची धुरा असल्यावर हे गृहीत धरायलाच हवे. त्यामुळे संमेलनाला झालेली प्रचंड गर्दी हेच या संमेलनाच्या यशाचे गमक ठरले. संमेलनातील वाङ्मयीन चर्चा व इतर कार्यक्रम यांच्या वेगळेपणावर संमेलनाचे यश मोजावे असे फारसे



काही हाती लागले नाही. असाच बहुतेकांचा ग्रह झाला. संमेलनासाठी खर्चही भरपूर झाला. नदीच्या पात्रात मातीचा भराव टाकून मंडप व स्टॉल उभारण्याच्या व्यापामुळेही या खर्चात भरच पडली. खासदार श्रीनिवास पाटील, मंत्री विलासराव पाटील उंडाळकर, यांनी संमेलनात कुठे काही उणे राहू नये अशी जबाबदारी उचललेली होती. आनंद परांजपे आणि मोहन कुलकर्णी या दोघां इव्हेंट्स मॅनेजमेंट - एक्स्पर्टनी समन्वयकाची भूमिका बजावून एकूण कार्य सुरळीतपणे सिद्धीस जावे म्हणून चारसहा महिने अहोरात्र काम केले. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. जोगळेकर यांनी या सर्वांवर आपला अंकुश ठेवून सूत्रधार म्हणून दृश्य-अदृश्य भूमिका मनोभावे बजावली. महामंडळाच्या इतर पदाधिकाऱ्यांना या प्रक्रियेत बघ्याच्या भूमिकेतच समाधान मानावे लागले. संमेलनाच्या भरपूर गर्दीचे श्रेय अर्थात कराडकरांकडे जाते. यशवंतराव चव्हाण यांच्या रसिक ग्रंथप्रेमाचा वारसा जपण्यात कुठेही कमी पडू नये अशी जणू प्रत्येक कराडकर कुटुंबाची भावना होती; त्यामुळे सहकुटुंब सहपरिवार उपस्थितीने प्रीतिसंगमावरचा हा तीन दिवसांचा उत्सव थाटामाटात होण्यात आपला संपूर्ण सहभाग हवा याबाबत सर्वजण दक्ष होते.

...गेल्या वर्षीच्या पुण्याच्या अमृत महोत्सवी संमेलनाच्या आटोपशीर आणि काटकसरीच्या निरुत्साही पार्श्वभूमीवर कऱ्हाड संमेलनाची भव्यता व रसिकांची गर्दी खरोखरच दृष्ट लागण्याएवढी भव्य होती !

## नरसिंहराव यांचे प्रकट चिंतन

या संमेलनातले सर्वात गाजलेले भाषण म्हणून उद्घाटक पी. व्ही. नरसिंहराव यांच्या भाषणाचा उल्लेख करावा लागेल. त्या भाषणात नरसिंहरावांनी भारतीय व जागतिक संदर्भात मराठी - आणि एकूणच प्रादेशिक - साहित्याच्या मर्यादांकडे लक्ष वेधले. मराठी साहित्य इतर भाषांमध्ये बरेच गेले आहे हा त्यांचा 'समज' तितकासा बरोबर नसला, तरी क्षणकाल मराठीप्रेमी श्रोत्यांच्या मनावर सुखकारक रोमांच आणणारा होता; परंतु पुढच्याच क्षणी मराठीने इतर भाषांमधील काय घेतले असा प्रश्न विचारून, ही एकतर्फी देवाण काही श्रेयस्कर नाही असा विचार मांडून आरोपीच्या पिंजऱ्यात मराठी साहित्यकारांना उभे केले. खरे म्हणजे नरसिंहराव यांच्या या दोन्ही विधानांत फारसे तथ्य नाही. मराठीत इतर भाषांतील पुस्तकांचे बरेच अनुवाद झाले आहेत; परंतु मराठीतील फारच थोड्या कलाकृतींचे अनुवाद इतर भाषांमध्ये झाले आहेत. त्याचा ठपका ठेवायचा तर इतर भाषांतील वाचक, अनुवादक व प्रकाशक यांच्यावर ठेवावा लागेल. मराठी लेखक तर आपले साहित्य इतर भाषांत जावे म्हणून उत्सुकच आहेत...परंतु एवढ्यावरच न थांबता, नरसिंहराव यांनी पुढे जो मुद्दा मांडला तो आपल्या एकूण साहित्यालाच मोडीत काढणारा ठरला. "आम्हाला देण्यासारखे तुमच्या साहित्यात नवीन काय आहे असा प्रश्न आपल्याला एका स्पॅनिश राजदूताने विचारला, तेव्हा मला काय उत्तर द्यावे हे कळले नाही, मी खजिल झालो." असे विधान नरसिंहराव यांनी केले. खरे तर प्रादेशिक भाषांमध्ये आजमितीला चांगले लेखन होत आहे; परंतु योग्य मार्केटिंग व प्रसिद्धी यांच्या अभावामुळे त्याची माहिती इतरांपर्यंत जात नाही; त्यामुळे ही खजिल होण्याची वा न्यूनगंडांची भावना नरसिंहराव यांच्या सारख्यांच्या मनात मूळ धरते आहे. इंग्रजीमधे लिहिणाऱ्या भारतीय लेखकांना त्यामानाने चांगली प्रसिद्धी मिळते आणि जगभर यांचा गवगवाही होतो. नरसिंहराव पंतप्रधान होते; आजही त्यांच्या शब्दाला किंमत आहे. प्रादेशिक भाषांतील नव्या साहित्यकृतींच्या

अनुवादासाठी त्यांनी काही तरतूद आपल्या सत्ताकालात केली असती तर भारतीय साहित्यात आम्हाला देण्यासारखे काय आहे हे सांगताना त्यांची जीभ अडखळली नसती. भाषावार प्रांतरचना वगैरे आंदोलनांना आंध्रप्रदेशातून खतपाणी मिळाले; आणि शेजारच्या प्रांतातील भाषांबद्दलचा दुस्वास-द्वेष प्रत्येक राज्यकर्त्याला मते मिळवण्यासाठी सोयीचा वाटू लागला. बेळगावातून मराठीचे उच्चाटन व्हावे यासाठी पद्धतशीर व्यूहरचना केली गेली. कानडी माध्यम सक्तीचे केल्याने मराठीतून शिकणे दुष्कर झाले. इतर दक्षिणी राज्यांतही असेच काही घडत राहिले. त्यामुळे भाषाभाषांमधील आदानप्रदान कमी कमी होत राहिले आहे. तरीही दिल्लीत प्रतिवर्षी भरणाऱ्या ग्रंथजत्रांमुळे भारतीय भाषांतील प्रकाशकांचा परस्पर संपर्क वाढून अनुवाद प्रक्रियेलाही नवी दिशा मिळत आहे, हेही नरसिंहराव प्रभृतींनी लक्षात घ्यायला हवे.. मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे गेल्या काही वर्षांत भारतीय भाषांतील गाजलेल्या कलाकृतींचे मराठी अनुवाद प्रकाशित केले जात आहेत. तसेच मराठी पुस्तकांचेही अनुवाद हिंदी व इतर भाषांमध्ये सध्या जात आहेत. 'महानायक' या विश्वास पाटील यांच्या नेताजींवरील कादंबरीचे पाच भाषांमध्ये अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत, अणि या वर्षादीड वर्षात आणखी पाच भाषांमधील अनुवाद प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर आहेत. अर्थात या क्षेत्रात करण्यासारखे खूप काही आहे; हे वास्तव आहेच.

**रससिद्धान्त ही भारताची जगाला देणगी**

नरसिंहराव यांनी जगाला काही नवे देण्याची क्षमता भारतीय साहित्यिकांमध्ये आहे का या प्रश्नांचे उत्तर देताना वेद, रामायण, महाभारत, पुराणे या पलीकडे जाऊन, रससिद्धान्त ही भारतीय संकल्पना मौल्यवान आहे; त्या सिद्धान्तातील फटींचा शोध घेऊन त्या कशा भरता येतील याचा विचार नवीन लेखकांनी करावा असे सुचवले. खरे तर भारतीय तत्त्वज्ञानात अनेक मौलिक संकल्पना आहेत; परंतु आधुनिक जागतिक परिभाषेत त्यांची मांडणी करणारे अभ्यासक, संशोधक व साहित्यिक पुढे यायला हवेत. मात्र त्या जुन्या वातावरणातच रमून भागणार नाही. नव्या समाज वास्तवाचेही प्रभावी चित्रण करणारेही प्रतिभावंतही हवेत..

पी. व्ही. नरसिंहराव यांच्या विवेचनाला प्रादेशिक, भारतीय तसेच जागतिक संदर्भ होता. त्यामुळे त्यांचे हे संदर्भसमृद्ध विचारमंथन श्रोत्यांना खिळवून ठेवणारे ठरले. त्यांचे मराठीही अस्खलित होते. त्यामुळे त्या भाषणाची रंगत आणखी वाढत गेली. अत्रे-फडके यांच्यात नवयुग आणि झंकार या साप्ताहिकातून चाललेला वाद हा पुण्यात फर्ग्युसनमध्ये शिकणाऱ्या तरुण नरसिंहरावांना दुसऱ्या जागतिक महायुद्धाइतकाच व्यापक व प्रभावशाली वाटला - हे त्यांच्या तोंडून ऐकताना आश्चर्यही वाटले आणि मजाही वाटली. या वादाचा उल्लेख अधूनमधून होतोच; परंतु त्याचे एखाद्या परप्रांतीय अभ्यासकाला इतके अप्रूप वाटावे हे कळल्यावर त्या वादाचे पुन्हा एकदा आपण अवलोकन करायला हवे; असा विचार प्रत्येक रसिकाच्या मनाला चाटून गेला असणार ! वाङ्मयीन क्षेत्रातील अशा घटनांचे पडसाद कुणाच्या मनावर कसे उमटतात, हाही एक अभ्यासाचा विषय होऊ शकेल.

**सुभाष भेंडे यांनी मांडलेले महत्त्वाचे मुद्दे**

माजी पंतप्रधानांच्या तासाभराच्या उद्‌घाटनाच्या भाषणानंतर संमेलनाचे अध्यक्ष डॉ.



सुभाष भेंडे यांचे भाषण काहीसे फिकेच वाटावे यात नवल नव्हते. डॉ. भेंडे हे सौजन्यशील, समन्वयवादी. त्यामुळे त्यांच्या एकूण विवेचनात सर्वांची राखावी अंतरे आणि गुण गाईन आवडी या सूत्रांचे प्राबल्य असणार हे स्पष्टच होते. त्यांच्या भाषणाची 'महाराष्ट्र टाइम्स' ने भेंड्यांची भाजी, अशी आणि 'लोकसत्ता'ने भेंड्यांची भेंडोळी अशी संभावना करावी - हे थोडे अतीच झाले ! मागच्या काही अध्यक्षीय भाषणांच्या तुलनेत ते अधिक वाङ्मयीन आणि सर्वस्पर्शी होते. गेल्या वर्षी राजेन्द्र बनहट्टी इंग्रजीचे व हिंदीचे मराठीवरील आक्रमण एवढ्यावरच बोलत राहिले. समकालीन साहित्याबद्दल त्यात एकही अक्षर नव्हते. अशी भुसभुशीत भाषणे बरीच झालेली असल्याने डॉ. सुभाष भेंडे यांच्या भाषणातील काही मुद्दे स्वागतार्ह नक्कीच आहेत. परंतु आधीच लांबलेल्या कार्यक्रमामुळे भेंड्यांचे भाषण रंगले नाही हेही खरे ! त्यात वृत्तपत्रांची अग्रलेखांमधून अशी संभावना ! साहजिकच भेंडे यांना त्याची खंत वाटली असणार ! साहित्य संमेलनाला राजकारणी व्यक्तींना बोलावण्याचा प्रकार थांबवावा, कारण त्या राजकीय नेत्यांची भाषणे झाली की मंडप ओस पडतो - त्यामुळे संमेलनाच्या अध्यक्षाकडेही दुर्लक्ष होते हा त्यांचा अनुभव - त्यांना खटकणारा वाटला. तसे त्यांनी नंतर उघड बोलूनही दाखवले.

तरीही भेंडे यांच्या भाषणातील काही मुद्दे महत्त्वाचे होतेच.

* साहित्याच्या अभिवृद्धीच्या दृष्टीने छोटी छोटी संमेलने उपकारक आहेत.

* ग्रामीण परिसरात साहित्य व भाषा याबद्दलच्या निर्विकल्प प्रेमाचे दर्शन अशा संमेलनाच्या रूपात घडते.

* साठोत्तरी काळात समाजाच्या सर्व स्तरातून साहित्यनिर्मितीचे झरे उमलून येऊ लागले. १९८० नंतर ग्रामीण भागातील परिवर्तन कथाकादंबऱ्यांतून अधिक जोमदारपणे रेखाटले जाऊ लागले. उदा. झाडाझडती (विश्वास पाटील) हाल्या हाल्या दूध दे (बाबाराव मुसळे), तहान (सदानंद देशमुख), भंडारभोग (राजन गवस), झुलवा (उत्तम बंडू तुपे).

* दलित साहित्याला या काळात बहर आला. पण बहुसंख्य दलित लेखकांचे अनुभवविश्व एकदोन कृतीतच संपल्याने, त्याला कुंठितावस्था आली.

* लेखन हे एक व्रत आहे. फावल्या वेळात करायचा तो उद्योग नाही. लेखकाची खरी कमाई म्हणजे ते लिहित असताना येणारा उल्हास, व्यावहारिक पातळीवरचा ताण आणि मनाला शांत करणारी दमणूक..''

* आपला बुद्धिजीवी वर्ग आपल्या कोषात पडून राहण्यात समाधान मानतो. तो स्पष्ट भूमिका घेत नाही. सत्ताधाऱ्यांचे लांगूलचालन करतो. आपला बुद्धिजीवी वर्ग हाती घेतलेले बौद्धिक काम पुरेशा गांभीर्याने करीत नाही.

* शुद्धलेखनाकडे मराठी माणसे लक्ष देत नाही.

* इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठी भाषा शुद्ध राहिलेली नाही.

* मराठी माणसाची वाचनसंस्कृती झपाट्याने ढासळत चालली आहे.

* गोमंतकात कोकणीऐवजी मराठीला राजभाषा म्हणून घोषित करायला हवे.

* मराठी लेखकांनी शासनाचा मिंधेपणा टाळावा.

- डॉ. भेंडे यांनी मांडलेले हे मुद्दे नवे नसले तरी ते पुन: पुन्हा ठासून मांडण्याची गरज आहेच. कऱ्हाड संमेलनाची ही एक फलश्रुती !



# साहित्यवार्ता

## 'माणुसकीचे स्वाभाविक आचरण शिकविणे हेच खरे मूल्यशिक्षण'

'पूर्वीच्या तुलनेने सध्याचा काळ बदललेला असून, या काळात शाळा-शाळांमधून मुद्दाम मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे लागते आहे. खरे तर माणुसकीचे स्वाभाविक आचरण करण्याची प्रेरणा देणे हेच खरे मूल्यशिक्षण होय व अशी प्रेरणा मुलांना लहान वयात प्राथमिक शाळेतूनच दिली गेली पाहिजे', असे उद्‌गार सुप्रसिद्ध साहित्यिक व कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक सदस्य मधु मंगेश कर्णिक यांनी काढले. ते लाधिवली, ता. खालापूर येथील जमनाबेन हिराचंद अंबानी विद्यालयात इ. चौथीच्या शिक्षकांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिरात बोलत होते. हे निवासी शिबिर दि. ११ ते १२ नोव्हेंबर २००२ रोजी झाले. रायगड जिल्ह्यातील २०० प्राथमिक शिक्षक सहभागी झाले होते.

मधु मंगेश कर्णिक यांनी सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन केले. ते पुढे म्हणाले की, इ. चौथीच्या परीक्षेबाबत आजपर्यंत बरीच चर्चा झाली आहे. ग्रामीण भागात ही परीक्षा अत्यंत आवश्यक आहे. खरे तर ही शिक्षकांची परीक्षा आहे. शिक्षकांनी रात्रंदिवस शिक्षणाचा व्यापक विचार केला पाहिजे. त्यांच्या नोकरीचे पर्व सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळात जरी असले तरी सायंकाळी ५ नंतर दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजेपर्यंत शिक्षकांच्या मनाची शाळा सुरू राहिली पाहिजे. त्याने नियोजित अभ्यासक्रम तर व्यवस्थितपणे शिकविलाच पाहिजे, पण त्याचबरोबर सातत्याने प्रयोगशील राहून आपल्या वर्गाच्या चार भिंतीमध्ये अनेकविध शैक्षणिक उपलब्ध करून मुलांच्या निर्मिती क्षमतेस खतपाणी घातले पाहिजे. मुले म्हणजे मातीचा गोळा ही पारंपरिक कल्पना मला मान्य नाही. माझ्या मते मुले म्हणजे चैतन्याने रसरसलेली फुले असतात. या फुलांच्या सद्‌गुणांचा सुगंध सर्वदूर पोहचविणे हे शिक्षकाचे काम आहे.

या उद्‌घाटन सोहळ्यास रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य शिक्षण समितीचे सभापती सुरेश म्हात्रे, रिलायन्स उद्योग समूहाचे उच्चाधिकारी टी. डी. भट, जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी डी. डी. पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी काईगडे इ. उपस्थित होते. खालापूर तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी गोरडे यांनी आभार मानले.

## रेवगावचे कर्मवीर भाऊराव पाटील वाचनालय

जेमतेम शंभर पुस्तके आणि एका घरात सुरू करण्यात आलेले जालना तालुक्यातील



रेवगाव येथील कर्मवीर भाऊराव पाटील वाचनालय बारा वर्षांनंतर आता स्वत:च्या सुसज्ज इमारतीत आठ हजार पुस्तकांसह गेले आहे.

चार साडेचार हजार वस्ती असणाऱ्या रेवगाव येथे काही हौशी मंडळींनी १९९१ मध्ये हे वाचनालय सुरू केले. इकडून तिकडून जमा केलेली शंभरएक पुस्तके आणि बारा नियतकालिके एवढ्याच पुंजीवर हे वाचनालय सुरू झाले. गावकऱ्यांनी श्रमदान करून वाचनालयास एक मोठी खोली बांधून दिली. त्यानंतर वाचनालय सुरू करणाऱ्या तरुणांनी अनेकांशी संपर्क साधून देणगीदाखल पुस्तके मिळविली. मग आमदारांनीही त्यात लक्ष घातले. आमदार कैलास गोरंट्याल यांनी आपल्या आमदारनिधीतून चार लाखांचा निधी या वाचनालयासाठी दिला. त्यातून या ग्रंथालयाची नवी, सुंदर इमारत उभी राहिली आहे. श्री. गोरंट्याल यांच्याच हस्ते या इमारतीचे उद्‌घाटन झाले. पुस्तकांची संख्या वाढल्याने ब वर्ग मिळालेल्या या वाचनालयात मान्यवर लेखकांची आठ हजार पुस्तके आहेत. सभासदांची संख्याही चारशेवर आहे. वाचकांमध्ये तरुण-तरुणींचे प्रमाण अधिक आहे. वाचनालयात आठ दैनिके, पाच साप्ताहिके, बावीस मासिके, एक पाक्षिक एवढी नियतकालिके नियमित येतात.

या वाचनालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने बहि:शाल शिक्षण केंद्र दिले आहे. वाचनालयातर्फे निरंतर शिक्षण केंद्रही चालविण्यात येते. इतर उपक्रमांमध्ये शेतीची भाषणे, व्यवसाय मार्गदर्शन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, वाचक स्पर्धा हे वाचनालयातर्फे चालतेच.

जालना शहरापासून दहा किलोमीटर अंतरावर असणाऱ्या या वाचनालयाने जिल्हा ग्रंथालय अधिवेशनही आयोजित केले. सचिव राम कदम आणि अध्यक्ष अशोक शेळके यांना गावकऱ्यांनी चांगली साथ दिल्याने या वाचनालयाचा दर्जा आणि उपक्रम सतत वाढत राहिले आहेत.

## मृगेंद्र राय यांना पीएच. डी.

खालसा महाविद्यालयातील प्राध्यापक मृगेंद्र राय यांना 'स्वातंत्र्योत्तर हिंदी काव्य नाटको में युगबोध' या विषयावरील प्रबंधासाठी मुंबई विद्यापीठाने पीएचडी दिली आहे.

या शोधप्रबंधासाठी डॉ. रामजी तिवारी यांनी मार्गदर्शन केले.

## 'ओव्या विठाईच्या' पुस्तकाचे प्रकाशन

'ओव्या विठाईच्या'हे पुस्तक म्हणजे प्रतिभासंपन्न साहित्याचा आविष्कार असून, या एका निरक्षर स्त्रीने केलेल्या ओव्या असल्याने त्याचे महत्त्व विशेष आहे, अशा शब्दात गौरव करून खासदार श्रीनिवास पाटील यांनी या पुस्तकाचे प्रकाशन केले. ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्या मातु:श्री विठाक्का चव्हाण यांनी गायलेल्या ओव्या ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी व नंदा सुर्वे यांनी संपादित केल्या.

## छोटी साहित्य संमेलने सद्‌भावनेचा जागर व संस्कार करतात

छोटी साहित्य संमेलने सद्‌भावनेचा जागर व संस्कार करीत आहेत, भयमुक्त मानवतेसाठी

लेखक-वाचकांनी विचारांचा जागर सुरू ठेवावा असे ज्येष्ठ कवी प्रा. फ. मुं. शिंदे यांनी इस्लामपूर येथे जागर सहित्य कला मंडळातर्फे भरलेल्या साहित्य संमेलन व ख्यातनाम तमासगीर, शीघ्रकवी पठ्ठे बापूराव पुण्यतिथी कार्यक्रमात सांगितले.

ते पुढे म्हणाले की, चांगल्या गोष्टींची दखल घेण्याची परंपरा लोप पावू लागली आहे. सद्‌भावना दुर्मिळ होत चालली आहे. अशावेळी छोटी संमेलने सद्‌भावनेचा जागर आणि संस्कार करण्याचे काम करीत आहेत. संत तुकाराम, बहिणाबाई यांनी माणसाने माणसावर प्रेम करावे अशीच शिकवण दिली. सद्‌भावना जागवताना लोकपरंपरेचा आधार असणे आवश्यक आहे. 'सद्‌भावना'ही समाजाचे नेतृत्त्व ठरली पाहिजे. जाणिवा समृद्ध होताना नेक विचारांचा पाठपुरावा हवा. ज्येष्ठ अभिनेत्री फैय्याज, मधू कांबीकर, काळू-बाळू यांच्या सहसंवादाला तसेच आदाकारीला प्रेक्षकांनी दाद दिली.

वात्रटिकाकार रामदास फुटाणे म्हणाले की, साहित्य संमेलनाला शासनाने दिलेले २५ लाख रुपये काही कुटुंबांसाठी खर्च होणे चुकीचे आहे. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, जागर अशा संस्थांना अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे संलग्नत्व मिळाले पाहिजे. त्याच त्याच कविता सादर करून प्रस्थापित होणाऱ्या कवींपेक्षा ग्रामीण भागात वावरणारे अनेक प्रतिभावान कवी चांगली निर्मिती करीत आहेत. माझ्या लेखनाची सांस्कृतिक प्रेरणा लोककलेशी निगडीत आहे. तमाशा आणि तमाशा कलावंतांची दखल समीक्षा घेत नाही. बालगंधर्व अमर होतात, सावळाराम खुडे, विठाबाई नारायणगावकर मागे राहतात. प्रा. देवदत्त पाटील यांच्यासारखे दर्जेदार साहित्य निर्मिती करणारे लेखक उपेक्षित राहतात.

यावेळी ज्येष्ठ तमाशा कलावंत काळू-बाळू यांना प्रा. शिंदे यांच्या हस्ते जागर पुरस्कार, स्मृती चिन्ह व पाच हजार रुपये रोख देण्यात आले. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई व शांताबाई यांचाही सत्कार करण्यात आला.

## 'अजिंठा' नियतकालिकास पुरस्कार

जळगावच्या मु. जे. महाविद्यालयाच्या सन २००१-२००२ या वर्षाच्या 'अजिंठा' नियतकालिकाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा रु. ११ हजाराचा प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अंतर्गत 'नवभारत युवा आंदोलन'द्वारो दरवर्षी राज्यस्तरावर महाविद्यालयीन नियतकालिकांची स्पर्धा आयोजित करण्यात येते.

'महिला सशक्तीकरण' वर्षाच्या निमित्ताने यंदा 'अजिंठा'चा स्त्री विशेषांक काढण्यात आला होता. अंकातील लेख, कविता, कथा इ. साहित्यातून स्त्रीविषयक जाणीवांबाबत लेखन विद्यार्थ्यांकडून लिहून घेण्यात आले आहे. या अंकाचे संपादन प्रा. गौरी राणे यांचे होते.

## तेंडुलकर गौरव नाट्योत्सव

गेली चार दशके भारतीय रंगभूमीवरील एक महत्त्वाचे नाटककार विजय तेंडुलकर यांनी ६ जानेवारीला पंचाहत्तरीची वेस ओलांडली. त्यांची नाटके भाषा-प्रांत-संस्कृतीच्या सीमा भेदून पार सर्वदूर पोहोचली आहेत. त्यांच्या या योगदानाबद्दल 'आविष्कार' या प्रायोगिक नाट्यचळवळीची गंगोत्री मानल्या जाणाऱ्या संस्थेने ६ ते २३ जानेवारी दरम्यान 'विजय तेंडुलकर गौरव



नाट्योत्सव' आयोजित केला होता.

तेंडुलकरांच्या 'शांतता ! कोर्ट सुरू आहे' या नाटकानंतर मतभेद झाल्याने 'रंगायन' या संस्थेतून बाहेर पडून काही रंगकर्मींनी १९७१ साली तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली 'आविष्कार'ची स्थापना केली. तेव्हापासून आजमितीपर्यंत या संस्थेने प्रायोगिक रंगभूमीची पताका शंभराहून अधिक कलाकृती रंगमंचावर आणून फडकत ठेवली आहे. मराठी नाट्य-चित्रपटसृष्टीतील आजचे बहुतेक महत्त्वाचे कलावंत कधी ना कधी 'आविष्कार'च्या मांडवाखालून गेलेले आहेत.

विजय तेंडुलकर यांचा आपल्या पंच्याहत्तरीनिमित्ताने नाट्योत्सव करायला सख्त विरोध होता; परंतु 'आविष्कार'चे अध्वर्यू अरुण काकडे यांनी त्यांना राजी केले. यानिमित्ताने तुमच्या साहित्यकृती व एकांकिकांचा नवी पिढी कशा तऱ्हेने विचार करते, कसा अन्वयार्थ लावते, काय प्रकारे ती त्यांना सामोरी जाते, हे पाहता येईल म्हणून तेंडुलकरांनी संमती दिली. परंतु आपण सत्कार वगैरे स्वीकारणार नाही, ही अट त्यांनी घातली.

या तेंडुलकर गौरव नाट्योत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या विविध भागांतील रंगकर्मींनी त्यांच्या साहित्यकृतींवर आधारित नाट्यकृती, तेंडुलकरांच्या एकांकिका तसेच दीर्घांक सादर केले.

## कवितांचे अभिवाचन

अवघ्या महाराष्ट्राला प्रिय असणाऱ्या निवडक कवितांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम श्रीमती सुनीता देशपांडे यांनी नुकताच सादर केला. गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी), बा. सी. मर्ढेकर, आरती प्रभू (चिं. त्र्यं. खानोलकर), बा. भ. बोरकर आणि पद्मा गोळे यांच्या निवडक कवितांच्या शब्दफुलांनी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचा रंगमंच दरवळून गेला. पु. ल. देशपांडे कला अकादमी येथे १२ जून रोजी म्हणजे पुलंच्या तिसऱ्या स्मृतिदिनी या अभिवाचनाची ध्वनिचित्रफीत दाखविण्यात येणार असून त्यासाठीचे ध्वनिचित्रण मोहन वाघ यांच्या दिग्दर्शनाखाली करण्यात आले. 'मी आता खूप थकलीये आणि पुढचा भरवसा कुणी द्यावा म्हणून मनात येताच कार्यक्रम सादर करावा, असं वाटलं.' असं सांगत सुनीताबाईंनी सुरुवात केली. या कवींबद्दलच्या आजवर जपून ठेवलेल्या हळुवार आठवणी सांगत सांगत, कविता म्हणताना मध्येच एखादं सौंदर्यस्थळ उलगडून दाखवत, कधी अर्थ सांगत, त्यांनी या कविता साभिनय म्हटल्या. कवितेतल्या प्रत्येक शब्दामागे दडलेला अर्थ त्यासाठीच्या आवाजात पोत सांभाळत सादर करताना सुनीताबाईंनी आपल्यातील अभिनयगुणांचं दर्शन घडवलं आणि या कविता पुन्हा एकदा नव्याने कळल्याची जाणीव उपस्थितांना झाली. मर्ढेकरांची 'फलाटदादा फलाटदादा, बोला वो तुम्ही' ही कविता असो की आरती प्रभूंची 'येरे घना येरे घना' ही कविता असो, त्यातील शब्दसंभार असा तोलात आणि बाजात आला की कविता आणि त्यातील अर्थ असे एकजीव होऊन गेले. पुलंचे मर्ढेकर हे अध्यापक. त्यांना पुण्यातल्या कार्यक्रमात भेटल्यानंतर घरी जेवायला येण्याचं निमंत्रण दिलं, तेव्हा भाकरी आणि पिठलं करण्याची त्यांची सूचना, 'बाकीबाब' बोरकर मृत्यूच्या दारात असताना झालेल्या शेवटच्या भेटीत त्यांनी 'ती' समुद्राची कविता म्हणण्याचा आग्रह, आरती प्रभूंच्या कविता 'सत्यकथे'त कशा प्रसिद्ध झाल्या त्याचा किस्सा इ. आठवणी सांगत त्यांनी या कवींच्या व्यक्तिमत्त्वाचे अनोळखी कोपरेही जिवंत केले. कविता कळायला त्यांच्या या गोष्टी अधिकच उपयोगी पडल्या.

## साहित्य अकादमीचे पुरस्कार

भारतीय चित्रपट, नाटक आणि साहित्य हे कसे टिकाऊ आहे आणि विदेशी व खास करून इंग्रजी कला व साहित्य हे कसे सर्वोत्कृष्ट आहे, असे बोलण्याची फॅशन आहे. यापैकी काहीजण भारतीय भाषांतील एक अक्षरही वाचत नाहीत, तसे ते वाचणे हा कमीपणा मानतात आणि 'देशी साहित्य टुकार आहे,' अशी शेरेबाजी करत असतात. पण भारतीय लेखकांचे विश्वही समृद्ध आहे. महान भारतीय लेखकांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण साधेपण आढळून येते. वीरेंद्र भट्टाचार्य, ताराशंकर बंदोपोध्याय, महाश्वेतादेवी, भैरप्पा, भगवतीचरण शर्मा अशा अनेकांच्या साहित्यकृती वाचून हाच निष्कर्ष काढावा लागतो. त्यांच्या साहित्यात गांधीवादाचे आकर्षण, दलित, शोषित आणि स्त्रियांबद्दलची कणव व भारतीय परंपरेतील आत्मिक शक्तीबद्दलचे भान प्रतिबिंबित होत असते. या पार्श्वभूमीवर भारतीय भाषांतील साहित्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने साहित्य अकादमीने पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली आहे. यंदाच्या वर्षी 'धुआँ' या उर्दू कथासंग्रहासाठी गुलजार यांना, तर महेश एलकुंचवार यांना 'युगांत' या नाटकासाठी पुरस्कार देण्यात आला आहे. संस्कृतमध्ये लेखन करणाऱ्या काशिनाथ मिश्र यांनाही हा सन्मान प्राप्त झाला आहे. संस्कृत लेखनासाठी पुरस्कार दिला जात आहे, हे फारच चांगले आहे. 'उच्चवर्गीयांच्या भाषेला उत्तेजन कशाला' असा उर्मट सवाल काही तथाकथित पुरोगामी करतील, पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करणेच उत्तम. आता 'मातीशी इमान राखून स्वाभाविकपणे येणाऱ्या सृजनाला अजूनही मान्यता मिळते, याचा आनंद वाटतो.' अशी प्रतिक्रिया गुलजार यांनी व्यक्त केली आहे. त्यांची प्रतिभाशक्ती अजूनही बहरत आहे. एकेकाळी साहित्याच्या इंग्रजीधार्जिण्या परपुष्टतेचा विचार मर्ढेकर यांनी मांडला. परंतु त्यातील मुख्य मुद्याकडे नीट लक्ष पुरविण्यात आलेले दिसत नाही, असे जाणकारांचे मत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात अनुवादाला थोडेबहुत पुरस्कार मिळू लागले, पण अनुवादप्रक्रिया बरीच मंदावलेली आहे. इंग्रजी आणि हिंदीत याबाबतची स्थिती वाईट आहेच; पण इतर भाषांतही अनुवादाची परिस्थिती छान आहे, अशातील भाग नाही. या पार्श्वभूमीवर इब्राहीम अफगाण यांना 'दीवारों के बीच' ही निदा फाजली यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी मराठीत 'हाक' या नावाने अनुवादित केल्याबद्दल पुरस्कार मिळाला, हे नोंदविण्यासारखे आहे. अफगाण हे म.टा.तील तरुण पत्रकार आहेतच, पण इतर भाषांतील साहित्यावर नजर ठेवणारे, कविता करणारे, गजलांत रमणारे आणि पत्रकारितेच्या दैनंदिन रगाड्यात व्यस्त असूनही, आपली संवेदना न गमावलेले लेखक आहेत. गुलजार यांच्यासारख्या वयस्क लेखकापासून ते अफगाण या तरुण लेखकांपर्यंत विविध व्यक्तींचा गौरव झाला, ही साहित्यप्रेमातून मारलेली आर्त 'हाक'च म्हटली पाहिजे. या हाकेला लेखकांनी संवेदनशील प्रतिसाद दिला पाहिजे.

(महाराष्ट्र टाइम्स - प्रवाह)

## ज्ञानेश्वरांच्या हरिपाठाचे अभंग आता मल्याळम भाषेत

माझ्या मऱ्हाटाची बोलु कवतिके परि अमृततेही पैजा जिंके । अशी मराठीची महती सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या सार्थ हरिपाठाचे अभंग मल्याळम भाषेतही रूपांतरित करण्यात आले आहेत. कोची येथे काशी मठ संस्थान, वाराणसीचे मठाधिपती सुधींद्रतीर्थ स्वामी यांच्या हस्ते रूपांतरित अभंगांचा तसेच पसायदानाचा समावेश असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

कीर्तनकार उमेश कामत यांनी पुस्तकाचे लेखन केले असून हरिपाठाचे २७ अभंग, ज्ञानदेव आणि तुकाराम आरती यांचा देखील त्यामध्ये, समावेश करण्यात आला आहे. ज्ञानदेव तसेच तुकारामांच्या अभंगांचा प्रसार करणे हे आपले ध्येय असल्याचे कामत मानतात. त्यामुळे हरिपाठावर कीर्तन करताना मराठीत अभंग गायन केल्यानंतर निरुपण मल्याळम भाषेत ते करीत आहेत.

महाराष्ट्राचे दैवत असलेल्या विठ्ठलाची केरळमध्ये कालिकत, कोची, काचमकोळम, तिरुअनंतपुरम येथे मंदिरे आहेत. त्यापैकी काचमकोळम येथील मंदिर १६ व्या शतकातील असून ते ग्रामदेवता म्हणून ओळखले जाते. उत्तर केरळमध्ये ज्ञानदेवांच्या हरिपाठाचे ठिकठिकाणी नियमितपणे वाचन केले जाते. साहित्यिक चंद्रशेखर पिल्ले यांनी केलेल्या ज्ञानेश्वरीच्या मल्याळम अनुवादाला ही केरळमध्ये चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## 'रामेश्वरम् ते राष्ट्रपती भवन' पुस्तकाचे प्रकाशन

राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रपती भवनापर्यंतची प्रवासाची कथा सांगणाऱ्या, निवृत्त ग्रंथपाल डॉ. शां. ग. महाजन लिखित 'रामेश्वरम् ते राष्ट्रपती भवन' या पुस्तकाचे कर्नाटक विद्यापीठाचे ग्रंथालयशास्त्र विभाग प्रमुख व भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. करिसिद्प्पा यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

या पुस्तकात डॉ. कलाम यांचे चरित्र तीन भागात मांडण्यात आले आहे. पहिल्या भागात क्षेपणास्त्र विकसनाच्या कार्यामधील त्यांचे कर्तृत्व तसेच रोहिणी, नाग इत्यादी क्षेपणास्त्रांची माहिती दिली आहे. डॉ. कलाम यांनी लिहिलेल्या 'इंडिया २०२०' व 'इग्नायटेड माइण्डस्' या पुस्तकांचा परिचयही आहे. दुसऱ्या भागात राष्ट्रपतींची निवड, कर्तव्ये इत्यादींचे माहितीसोबत त्यांची सुवचनेही आहेत. तिसऱ्या भागात आतापर्यंत झालेले राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांच्याबद्दलची माहिती, काही क्षेपणास्त्रांची चित्रे असा तपशील असलेली परिशिष्टे आहेत. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे यांची प्रस्तावना आहे. कलाम यांचे विचार व त्यावरील प्रतिक्रिया हा ग्रंथाचा महत्त्वाचा भाग असल्याचे लेखक श्री. महाजन यांनी सांगितले.

## गज्वींच्या 'घोटभर पाणी'चा रौप्यमहोत्सव

नाटककार प्रेमानंद गज्वी यांच्या बहुचर्चित आणि मराठी नाट्येतिहासात महत्त्वपूर्ण ठरलेल्या 'घोटभर पाणी' या एकांकिकेचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने 'अनुभव' ही संस्था व 'मॅजेस्टिक प्रकाशन' यांच्या वतीने २० डिसेंबर २००२ रोजी 'घोटभर पाणी' रौप्यमहोत्सवी वर्षोत्सव समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या समारंभात 'एकांकिका-एक वाङ्मय प्रकार' या विषयावर परिसंवाद झाला. त्यात डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. वसंत आबाजी डहाके, प्रा. दिगंबर पाध्ये, डॉ. अनंत देशमुख हे वक्ते बोलले. त्याचवेळी 'अंक-एकांक' हा प्रेमानंद गज्वी यांच्या एकांकिकेचा प्रा. म. द हातकणंगलेकर, प्रा. सुरेश मेश्राम व अरुण घाडीगावकर यांनी संपादित केलेला समीक्षा ग्रंथ डॉ.जब्बार पटेल यांच्या हस्ते प्रकाशित झाला. प्रा. दीपक घारे व चंद्रकांत कुलकर्णी हे प्रकाशन

समारंभातील प्रमुख वक्ते होते. बाळ रणखांबे दिग्दर्शित 'घोटभर पाणी' या एकांकिकेचा प्रयोगही झाला.

## विविध भाषांच्या परिणामांवर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन

इराण कल्चर हाऊस, मुंबई आणि डेक्कन रीसर्च इन्स्टिट्यूटतर्फे १४ ते १६ डिसेंबर दरम्यान राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादाचे उद्घाटन इराणचे महाविद्यालय दूत मेहरी हुनरदुस्त यांच्या हस्ते झाले.

दिल्ली विद्यापीठाचे मानद प्राध्यापक डॉ. अमीन हसन आबिदी, इराण कल्चर हाऊसचे संचालक युसुफी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

भाषाशास्त्रज्ञ प्रा. लक्ष्मण खुबचंदानी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. देशातील विविध विद्यापीठातील पंचवीस तज्ज्ञांनी शोधनिबंध सादर केले. पुण्यातील डॉ. एम. जी. धडफळे व संजय गोडबोले यांनी शोधनिबंध सादर केले. तसेच प्रा. कमल गफार, प्रा. हवेवाला, प्रा. सईद, प्रा. रामिरी, ता. कासमी, डॉ. आजुरदा, प्रा. फालिमा बेगम, प्रा. सतिन्दर सिंग यांनी शोधनिबंध सादर केले. या संमेलनात फार्सी भाषा व तिचा उर्दू, हिंदी, मराठी, कोकणी, गुजराती, तामिळ, तेलगु, गुजराथी, कन्नड, सिंधी, पंजाबी या भारतीय भाषांशी झालेला समन्वय व परिणाम या विषयांवर चर्चा झाली. इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. ए. एम. दळवी यांनी संयोजन केले.

## नवोदित कवींसाठी हक्काचं व्यासपीठ

''मी पंच्याऐंशीपासून काव्यशिल्पमध्ये येतेय. माझ्या सुरुवातीच्या काळात नवीन कविता वाचून दाखवायला मला एक व्यासपीठ मिळालं. इतरांच्या कविता ऐकायला मिळाल्या. मला काव्यशिल्पमध्ये येऊन दुहेरी फायदा झाला'' असे आसावरी काकडे यांनी म्हटले आहे. त्यांच्यासारख्या अनेक कवी-कवयित्रींना त्यांच्या उमेदवारीच्या काळात काव्यशिल्पच्या रूपाने हक्काचं व्यासपीठ मिळालं. आपली कविता काव्यप्रेमींमुळे सादर करण्याची संधी मिळाली. एखादा कवी घडायला त्याच्या अंगभूत लेखन गुणांबरोबर प्रोत्साहनपर वातावरणाची गरज असते. ही गरज काव्यशिल्प जवळजवळ तीस वर्षांपासून पूर्ण करत आहे.

काव्यशिल्पचे विद्यमान अध्यक्ष घनश्याम धेंडे यांच्या मते ''नवोदितांना आत्मविश्वास सापडण्यासाठी काव्यशिल्प हे महत्त्वाचं व्यासपीठ आहे. केवळ नवोदितच नव्हे, तर काव्यशिल्पमधून उमेदवारी केलेले आणि आज नाव मिळवलेले अनेक सभासद आहेत.'' कवींची, कवींनी निर्माण केलेली, कवींसाठीची संस्था म्हणजे 'काव्यशिल्प'. सुमारे तीस वर्षांपूर्वी द्वारकानाथ लेले, कल्याण इनामदार, कै. सुधाकर नेर्लेकर, सौ विमल लिमये यांनी काव्यशिल्पची मुहूर्तमेढ रोवली. महिन्यातून एकदा कुणाच्या तरी घरी जमून आपापल्या कविता वाचणे सुरू झाले. पुण्यातले बरेचसे कवी, काव्यशिल्पचे सभासद होते. अनिल कांबळे, इलाही जमादार, आसावरी काकडे, अंजली कुलकर्णी, स्नेहसुधा कुलकर्णी, स्वाती सामक, दीपक करंदीकर, मनोहर सोनवणे, जयंत भिडे अशी कितीतरी नावे सांगता येतील.

दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी काव्यशिल्पचे सर्व सभासद साहित्य परिषदेच्या



सभागृहात एकत्र जमतात. आपापल्या कविता वाचतात. अधूनमधून काव्यविषयक चर्चाही घडतात. 'शक्यतो नवीन कविता वाचायची' हा प्रत्येक सभासदाने स्वत:ला घालून घेतलेला अलिखित नियम ! काव्यशिल्पचे कामकाज लोकशाही तत्त्वांवर आधारित आहे. वर्षभरासाठी अध्यक्ष व सचिव नेमून त्यांनी वर्षभर कामकाज पहावे असे ठरले. आपोआपच संस्थेचे स्वरूप येऊन एक प्रकारची शिस्तबद्धता आली. सतत ३० वर्षे 'काव्यशिल्प' ही संस्था कार्यरत आहे. 'सातत्य, साहित्य आणि साहचर्य' हे तीन शब्द काव्यशिल्पींच्या मनात सतत घोळत असतात.

काव्यशिल्पच्या मासिक सभांमध्येच वैविध्य आणण्याचा पदाधिकाऱ्यांचा प्रयत्न असतो. कधी 'गझल' या काव्य प्रकारची माहिती देणारे व्याख्यान, कधी एकाच विषयावरच्या कवितांचे वाचन असे कार्यक्रम आखिले जातात. वर्षातून एक सहल, कोजागिरी आणि एक संपूर्ण स्नेहसंमेलन असे वार्षिक नियोजन असते. ११९८ च्या नाशिक सहलीतील कुसुमाग्रजांची भेट असाच एक संस्मरणीय प्रसंग ! वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने अनेक मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून काव्यशिल्पमध्ये येऊन गेले. गंगाधर महांबरे, प्रभा गणोरकर, निरंजन उजगरे, किशोर पाठक, रवींद्र पिंगे इ. नावे सांगता येतील. काव्यशिल्पचे महत्त्वाचं वेगळेपण म्हणजे सर्व वयोगटातील कवींचा यात सहभाग आहे. चांगल्या कवितेला जशी दाद दिली जाते, तसेच 'परत एकदा रीराईट कर ही कविता'- 'इथे मात्रा कमीजास्त झाल्या आहेत. तेवढे पाहशील' असे प्रेमळ सल्ले दिले जातात. ते ऐकलेही जातात.

संपर्क : काव्यशिल्प, द्वारा - घनश्याम धेंडे, दूरध्वनी - ५६६२२५९

## इलेक्ट्रॉनिक माध्यमांची शक्तिस्थाने ओळखावीत

मुलांची मानसिकता बदलावयाची असेल तर इलेक्ट्रॉनिक माध्यमांची शक्तिस्थाने ओळखावीत आणि त्यांचा अधिकाराने उपयोग करावा, असे मत सोळाव्या बालकुमार संमेलनाचे अध्यक्ष पु. ग. वैद्य यांनी या संमेलनातील एका परिसंवादात मांडले.

'इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या जमान्यातील बालकांची मानसिकता व लेखकांची जबाबदारी' या विषयावरील परिसंवादात वैद्य म्हणाले, की इलेक्ट्रॉनिक माध्यमे हे एक साधन आहे. पण त्यातले सॉफ्टवेअर लिहिणारी माणसे म्हणजे आपण लेखकच आहोत. त्यामुळे माध्यमांच्या संहितेचा अभ्यास करून आपल्याला बदलता येईल, असेही ते म्हणाले.

विश्वास वसेकर म्हणाले, या जमन्यातील मुले ही टी. व्ही. पेशंट्स झाली आहेत. ती अकाली तरुण होताना दिसत आहेत, ही गंभीर समस्या आहे.

डॉ. अनिमिष चव्हाण म्हणाले, की संगणकयुगात वेगाला फार महत्त्व आले आहे. मग तो बोलण्यातील असेल किंवा दळणवळणातील. शिवाय माध्यमांच्या भारंभार उपलब्धतेतही मुलांना गुंतवण्याची क्षमता आहे. या वेगाला पुरून उरण्यासाठी मैत्री, प्रेम, निसर्ग असे आधार हवे आहेत. आपल्या पाच वर्षांच्या नातवाला मृत्यू फक्त गोळीनेच येऊ शकतो, असे वाटते, अशी खंत नागपूरच्या शैलजा काळे यांनी व्यक्त केली. त्या पुढे म्हणाल्या, की त्याला पत्र म्हणजे काय, हे देखील माहीत नाही. मुलांच्या या जाणिवा विकसित करून त्यांना आनंद देण्याची जबाबदारी बाललेखक म्हणून आपलीच आहे, असेही त्या म्हणाल्या.

वसंत निगवेकर म्हणाले, की वेगवान युगाशी सुसंगत लिहिणारा लेखकच टिकणार

आहे. जीवनातील जुनी मूल्ये जपण्याचे आणि शॉक ॲबसॉबर्सचे काम बालसाहित्यिकांनी करायचे आहे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी जी क्रांती केली आहे, तिचे स्वागत करूया, असे सांगून रंगकर्मी तुषार भद्रे म्हणाले की, त्याचवेळी टी. व्ही.सारख्या माध्यमांमुळे हे घर आपले नाही, असे मुलांना वाटते आहे, ही फार काळजीची गोष्ट आहे.

## विद्यापीठीय शिक्षणाची फेररचना आवश्यक

''विज्ञान हाच देशाच्या विकासाचा पाया असतो. सध्याच्या आपल्या विद्यापीठीय शिक्षण पद्धतीमुळे हा पायाच कमकुवत बनत चालला आहे.'' अशी खंत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सी. एन. आर. राव यांनी व्यक्त केली.

''संशोधक घडविण्याची विद्यापीठाची क्षमता नाहीशी होत चालली आहे. ती पूर्णपणे नष्ट होण्याआधी आपण सावध व्हायला हवे. विद्यापीठीय शिक्षणाची फेररचना केली पाहिजे. त्यासाठी शिक्षक, शास्त्रज्ञ, सरकार, नोकरशहा आदींनी एकत्रितपणे प्रयत्न केले पाहिजेत; अन्यथा देशाचे भवितव्य अंध:कारमय राहील,'' असा इशारा त्यांनी दिला.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या षष्ट्यब्दीनिमित्त राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेने (एनसीएल) आयोजिलेल्या चर्चासत्रात 'सायन्स इन अवर फ्युचर' या विषयावर ते बोलत होते. 'क्रिएटिंग ए वेल्थपिरॅमिड : पार्टनरशिप ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी, इनोव्हेशन अँड आंत्रप्रेन्युअरशिप' या विषयावरील या चर्चासत्रात 'इन्फोसिस'चे संस्थापक डॉ. एन. आर. नारायणमूर्ती, अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. एम. एम. शर्मा, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, टीव्हीएस मोटर्सचे वेणू श्रीनिवासन, 'ल्युपिन' कंपनीचे देशबंधू गुप्ता आणि रिलायन्स उद्योगसमूहातील के. पी. नानावटी आदींनी भाग घेतला.

''संपत्ती निर्माण करण्यासाठी आणि त्या आधारे विकास साधण्यासाठी पिरॅमिडचा पाया विज्ञानात आहे. त्यामुळे विज्ञानाभिमुख दृष्टिकोन असायलाच हवा,'' असे स्पष्ट करून डॉ. राव म्हणाले, ''विज्ञानात संशोधन महत्त्वाचे असते. याबाबतीत आपल्याकडे एकेकाळी विद्यापीठांनी मोलाची भूमिका बजावली होती; परंतु आता तशी स्थिती राहिलेली नाही. काही अपवाद वगळता विद्यापीठांमध्ये उत्कृष्ट संशोधन होत नाही. शिक्षणाचा बाजार झाला आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवी देण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे बेरोजगारांची फौज तयार होत आहे. दुसरीकडे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना प्रगत देश आकर्षित करून घेत आहेत.''

मूल्ये बदलल्याचा उल्लेखही त्यांनी केला. ते म्हणाले, ''आज सर्वांना झटपट श्रीमंत व्हायचे आहे. त्यासाठी शिकण्याची, कष्ट करण्याचीही तयारी नाही. संशोधन, अभिजात कला, संगीत, साहित्य यांमध्ये सर्जनशीलता असते. त्यातून अवर्णनीय आनंद मिळत असतो आणि संपत्तीही मिळत असते; मात्र असा विचारच मांडणारे कमी झाले आहेत. त्यामुळे ही स्थिती बदलण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करायला हवेत.''

## कारभारात पारदर्शकता हवी

डॉ. नारायणमूर्ती यांनी, 'बिल्डिंग अ सस्टेनेबल ऑर्गनायझेशन' या विषयावर विचार



मांडले. सर्व स्तरांवरील नवतेला, अत्युत्कृष्टतेला प्रोत्साहन, पारदर्शक कारभार, नियमांमधील सुलभता आणि सामाजिक बांधिलकी ही वैशिष्ट्ये असणारी संस्था किंवा कंपनी यशाच्या शिखरापर्यंत पोचतेच, असे त्यांनी नमूद केले. या प्रत्येक वैशिष्ट्याबाबत 'इन्फोसिस'ने काय केले याची उदाहरणे त्यांनी दिली. ते म्हणाले, ''नवता म्हणजे नावीन्यपूर्ण कल्पना. संस्थेत फक्त एका विभागात नवता असून चालणार नाही. सर्व विभागांत ती असली पाहिजे. नवतेला प्रोत्साहन देणारे धोरण असले पाहिजे. सर्वोत्कृष्टतेचाच ध्यास घेतला पाहिजे. दुय्यम दर्जाला स्थानच दिले जाऊ नये. कारभारात पारदर्शकता असली पाहिजे. या वैशिष्ट्यांमुळे यश येतेच; पण त्यामुळे हुरळून जाऊ नये. आलेल्या संपत्तीचा समाज उभारणीसाठी उपयोग केला पाहिजे.''

## कल्याणच्या सार्वजनिक वाचनालयाचा शतकोत्तर रौप्यमहोत्सव

वाचन संस्कृती जपणारे केंद्र म्हणून ओळखले जाणारे कल्याण सार्वजनिक वाचनालय सव्वाशे वर्षांची वाटचाल पूर्ण करीत आहे.

या वाचनालयाची सुरवात १८७८ मध्ये १४३ ग्रंथांनी झाली. आता या वाचनालयात कादंबऱ्या, लघुकथा, चरित्र, ऐतिहासिक, धार्मिक, राजकीय, विज्ञान अशा १७ विभागात जवळजवळ ६३ हजार पुस्तके आहेत. यामध्ये फक्त मराठीच नव्हे, तर हिंदी व इंग्रजी पुस्तकांचाही समावेश आहे; तसेच शंभर वर्षांपूर्वीची दुर्मिळ पुस्तकेही येथे आहेत. सध्या येथे ११ कर्मचारी आहेत. या ग्रंथालयाचे बावीसशे सभासद आहेत. कमीत कमी वर्गणी हे याचे वैशिष्ट्य आहे. महिलांसाठी मासिक पुस्तक योजना आहे, तर लहान मुलांसाठी खास 'बाल विभाग' आहे.

वाचनालयाच्या उपक्रमात मुक्तद्वार ही महत्त्वाची योजना आहे. शहराच्या विविध भागात शाखा काढण्याचा मानस आहे. त्याप्रमाणे वाचनालयाचे आधुनिकीकरण व संगणकीकरण करण्यात येत आहे. शतकोत्तर रौप्यमहोत्सवाचा सांगता कार्यक्रम १२ जानेवारीला साजरा करण्यात आला. या प्रसंगी साहित्यिक, व संतवाङ्मयाचे अभ्यासक डॉ. यशवंत पाठक प्रमुख पाहुणे होते. खासदार प्रकाश परांजपे, माजी खासदार राम कापसे व महापौर मंगला शिंदे आदी मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

## कन्नड संमेलनाचे पडघम

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीची मांडवपरतणी झाल्यावर आता अखिल भारतीय कन्नड साहित्य संमेलनाचे पडघम वाजू लागले आहेत. साहित्य संमेलनाची कर्नाटकातही जुनी परंपरा आहे आणि अनेक जिल्ह्यांमध्ये स्थानिक साहित्य संमेलने उत्साहाने दर वर्षी भरत असतात. हे अ. भा. कन्नड साहित्य संमेलन बहात्तरावे आहे; यावरून त्याच्या परंपरेची, वाटचालीची कल्पना येऊ शकते. फेब्रुवारी महिन्यात हे संमेलन भरणार आहे. हे संमेलन होणार आहे बेळगाव या महाराष्ट्रीय चेहऱ्यामोहऱ्याचा शहरांत अध्यक्षपदासाठी जी केंद्रीय समिती आहे, तिची बैठक श्रवणबेळगोळ या जैन धर्मीयांच्या अतिशय प्रभावी आणि संपन्न अशा तीर्थक्षेत्रस्थळी होणार आहे. म्हैसूरचे नामवंत लेखक ए. बसवराज, ज्येष्ठ पत्रकार पुट्टप्पा पाटील, नामवंत रंगकर्मी चंद्रशेखर कंबर, माजी कुलगुरू एम.

एम. कलबुर्गी, ज्येष्ठ लेखक एन. के. कुलकर्णी यांची नावे समोर आली आहेत. या वेळी या संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान उत्तर कर्नाटकातील एखाद्या नामवंताला मिळावा, असे मत या वर्गाने व्यक्त केले आहे.

## 'आधुनिक भारताच्या इतिहासाचे राजवाडेंकडून मूलभूत चिंतन'

''इतिहासाचार्य राजवाडे हे चतुरस्र प्रतिभावंत संशोधक होते. त्यांनी आधुनिक भारताच्या इतिहासाचे मूलभूत चिंतन केले. हे त्यांनी विविध ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावनेतून आणि लेखातून त्यांचे इतिहास विचार दिसून येते,'' असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त राजवाडेप्रेमी मंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस डॉ. श्री. मा. भावे यांचेही भाषण झाले. 'समग्र राजवाडे' ग्रंथाचे संपादक प्रा. मु. ब. शहा अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ विचारवंत ग. प्र. प्रधान यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. मोरे म्हणाले, ''राजवाडे यांचे लिखाण वाचणे हे अवघड काम आहे. त्यांच्यावर चिपळूणकरांचा प्रभाव होता. युरोपातील ज्ञानविज्ञान आपल्या भाषेत आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. इतिहासाचे लेखन देशलक्षी न लिहिता ते काललक्षी पद्धतीने लिहावे असे त्यांचे म्हणणे होते. त्यांचा महाराष्ट्र धर्माचा विचार हा जरी केशवाचार्य आणि समर्थांच्या काळापासूनचा असला तरी त्यांनी त्यात आपले विचार वेगळ्या प्रकारे मांडले. मराठ्यांचा इतिहास महाराष्ट्र धर्माच्या संकल्पनेवरून लिहिला. मराठ्यांचा इतिहास म्हणजे भारताचा इतिहास आहे, असे ते मानत. इतिहास लिहिताना त्यांच्या काही चुका झाल्या तरी त्यामुळे त्यांचे योगदान कमी होत नाही.''

महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. ग. प्र. प्रधान यांचा सत्कार करण्यात आला. शांता रानडे यांनी आभार मानले.

## धर्म नाकारून धर्मांधतेला पायबंद बसणार नाही

यापुढे केवळ धर्म नाकारून वाढत्या धर्मांधतेला पायबंद घालता येणार नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजवादी नेत्या सुधाताई वर्दे यांनी केले.

समाजवादी महिला परिषदेच्या एकोणिसाव्या द्वैवार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. ज्येष्ठ लेखिका प्रा. कमल देसाई यांनी यावेळी 'मुक्ताई'या स्मरणिकेचे प्रकाशन केले. दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात झालेल्या या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी सभेच्या प्रदेशाध्यक्षा पुष्पाताई मायदेव होत्या.

श्रीमती वर्दे म्हणाल्या, ''आम्ही समाजवादी विचारांच्या मंडळींनी देव व धर्म नाकारला. लोकांनी आम्हाला नाकारले. आम्ही सामान्य माणसाच्या धर्मप्रेमाची उपेक्षा केली. त्याचवेळी संघपरिवातून पुढे आलेल्या हिंदुत्ववाद्यांनी त्या सामान्य माणसांचा ताबा घेतला. गोध्रातील घटनांनंतर आम्ही आणखी बाजूला पडलो. आदिवासींच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर मेधा पाटकर लढत आहेत; मात्र त्याच आदिवासींमध्ये 'भगवे' केव्हा घुसले ते आम्हाला समजलेच नाही.''

गोध्रातील घटनेचा मुस्लिम समाजाच्या सर्व स्तरांतून जोरदार निषेध व्हायला हवा होता;



तसा तो झाला नाही, असे मत व्यक्त करून त्या म्हणाल्या, ''भक्तिभाव जपणाऱ्या सामान्य माणसाला दूर लोटून आम्ही तथाकथित हिंदुत्ववाद्यांनाच संधी दिली, यापुढे अशा सामान्य माणसांशी आम्ही मैत्री केली पाहिजे.''

श्रीमती वर्दे म्हणाल्या, ''वारकरी आणि संघाच्या भगव्या रंगातील फरक ओळखला पाहिजे. धर्म मानणाऱ्यांना बाजूला लोटून चालणार नाही. सर्व ज्येष्ठ समाजवादी नेत्यांनी याचा विचार केला पाहिजे. संघ व भाजपचा हिंदुत्ववाद अधिक घातक आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.'' प्रा. देसाई म्हणाल्या, ''सर्वच धर्मांनी स्त्रीला नाकारले आहे. त्यामुळे स्त्रीने धर्मांचा विचारच करू नये, असे मला वाटते. परमेश्वर आहे, असे मी मानते. मात्र धर्म मानत नाही. धर्म व परमेश्वर यामध्ये फरक केला पाहिजे. खरे म्हणजे मानवता हाच धर्म मानला पाहिजे.''

श्रीमती मायदेव म्हणाल्या, ''धर्मांधतेला विरोध हा झालाच पाहिजे. कारण त्याच्या बळी महिलाच प्रामुख्याने असतात. दहशतवाद आणि धर्मांधतेला सुशिक्षित व मध्यमवर्गातून मिळणारा पाठिंबा ही सर्वाधिक चिंताजनक गोष्ट आहे. गुजरातमधील हिंसाचार व तथाकथित हिंदुत्ववादाचे कोणत्याही परिस्थितीत समर्थन होऊ शकत नाही.''

## वाजपेयींच्या कवितांवरील नृत्य-नाट्य आविष्कार

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हिंदी कवितांच्या संगीत, नृत्य, नाट्य, कला रूपातील आविष्काराने रसिकांची मने जिंकली.

वाजपेयी यांच्या वाढदिवसानिमित्त 'संवाद' व 'चिरंजीव' या संस्थांतर्फे आओ फिरसे दिया जलाएँ' हा कार्यक्रम झाला. ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले, कवी गंगाधर महांबरे, भाजपचे शहराध्यक्ष अनिल शिरोळे, गायक रवींद्र साठे, अनुराधा मराठे, संयोजक सुहास सोनावणे, 'संवाद' संस्थेचे सुनील महाजन, कार्यक्रमाचे दिग्दर्शक मुकुंद नाईक, निकिता मोघे आदी या प्रसंगी उपस्थित होते. 'यदा यदाही धर्मस्य' या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर उंचाई, 'तन पर पहरा बैठ रहा है', 'झूक नही सकता' आदी कविता सादर करण्यात आल्या. 'आज सिंधू में धार उठा है' या कवितेवरील नृत्याने प्रेक्षकांची दाद मिळविली. 'उनकी याद करो' या स्वातंत्र्यवीरांवरील गीताने रसिकांची मने हेलावली. पंतप्रधान वाजपेयी यांच्या कवितांच्या प्रा. कमलाकर सोनटक्के यांनी केलेल्या मराठीतील अनुवादाचे वाचन करण्यात आले.

## 'लेखकांनी ध्येयवादी पिढी तयार करावी'

''समाजातील चांगल्या व आदर्श व्यक्तींची चरित्रे तरुण पिढीसमोर ठेवणे आवश्यक आहे. ध्येयवादी व निष्ठावान पिढी तयार करण्यासाठी अस्मितेची ज्योत जागृत करण्याचे काम लेखकांनी करावे,'' असे मत 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया यांनी व्यक्त केले.

डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी लिहिलेल्या 'गांधी ते पटेल' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. धारिया यांच्या हस्ते झाले. डॉ. शां. ब. मुजुमदार अध्यक्षस्थानी होते.

''मराठी तरुणांना पुढे जायचे असेल, तर गरिबीचे उदात्तीकरण करणे सोडून दिले पाहिजे. ही मानसिकता मराठी माणसाने बदलणे आवश्यक आहे. मनोहर जोशी यांचे या

पुस्तकात रेखाटलेले व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर ठेवले पाहिजे,'' असे डॉ. मुजुमदार यांनी सांगितले.

''राजीव गांधी ते जब्बार पटेल अशी विविध क्षेत्रांतील माणसे मी निवडली आहेत. त्यात राजकारणापेक्षा ध्येयधोरणाबद्दल मी लिहिले आहे, तसेच छोट्या गोष्टींमधून माणूस कसा दिसतो, हे निरीक्षण केले आहे,'' असे मनोगत डॉ. मेहेंदळे यांनी या वेळी व्यक्त केले.

'सिग्नेट पब्लिकेशन'चे संचालक प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविक केले. मधुकर फुकणे यांनी आभार मानले. डॉ. बीना इनामदार यांनी सूत्रसंचालन केले.

**नवे दोन मजली ग्रंथदालन : पाथ फाइंडर**

संगीताची मंद धून ऐकत, गरम कॉफीचे घुटके घेत, शांतपणे पुस्तक चाळा, वाचत बसा, पुस्तकांविषयी चर्चा करा... आणि आवडलेले पुस्तक आपल्या खासगी ग्रंथालयासाठी खरेदी करा.

नीलायमशेजारच्या एका बंगल्यातील सुमारे चार हजार चौरस फूट जागेत पाथ फाइंडर हे ग्रंथदालन उभारण्यात आले आहे. तळमजल्यावरील दालनात नवीन प्रकाशनांची माहिती मिळेल. वेगवेगळ्या नियतकालिकांचा आणि मुलांच्या पुस्तकांचा कक्षही येथे आहे. कॉफी व ज्यूसची येथे सोय आहे. दुसऱ्या मजल्यावर हिंदी, मराठी व इंग्रजी पुस्तकांचे दालन आहे. या दालनात विषयानुसार पुस्तके मांडण्यात आली आहेत. इंग्रजीतील जगभरच्या दीडशे प्रकाशकांची पुस्तके येथे पाहायला मिळतात. मराठीतीलही महत्त्वाची पुस्तके व प्रकाशक येथे दिसतात. पुस्तकांशी संबंधित सॉफ्टवेअर प्रॉडक्टही येथे मिळतील. अभिजात साहित्यकृती येथे आवर्जून ठेवण्यात आल्या आहेत; पण महत्त्वाच्या लेखकांची सर्वांगीण माहिती येथे फलकावर लावण्यात आली आहे. उपलब्ध पुस्तकांची माहिती संगणकावरही मिळू शकेल व आपली मागणी नोंदवताही येईल.

'पाथ फाइंडर'चे प्रदीप खिरे म्हणाले, ''मला पुस्तकांची खूप आवड आहे. पुस्तकांची, लेखकांची वर्दळ आपल्याकडे असावी अशी माझी इच्छा होती. जागा मोकळीच होती. ती भाड्याने देण्याऐवजी पुस्तकप्रेमींसाठी 'कट्टा' निर्माण करावा, या इच्छेतून हे दालन उभे राहिले आहे.''

श्री खिरे यांची मुलगी शिल्पा व तिचे पुस्तकप्रेमी मित्र या दालनाचे व्यवस्थापन पाहणार आहेत. शैलेश दामले हा या चमूचा प्रमुख. तो वर्षभर या प्रकल्पासाठी काम करीत होता. येथे काही सांस्कृतिक कार्यक्रमही केले जाणार आहेत, 'आशय सांस्कृतिक'च्या सतीश जकातदार व वीरेंद्र चित्राव यांनी या कार्यक्रमांची जबाबदारी स्वीकारली आहे. चित्राव म्हणाले, ''दुसऱ्या मजल्यावरील मंचावर महिन्यातून किमान दोन कार्यक्रम होतील. साहित्यिक गप्पा, लेखकांवरील ध्वनिचित्रफिती, पुस्तक प्रकाशने, वाचकचर्चा असे कार्यक्रम होतील. हा एक 'सांस्कृतिक कट्टा' बनावा, अशी आमची अपेक्षा आहे.''

**साहित्यिकांनी कोणत्याही विचारसरणीच्या आहारी जाऊ नये- डॉ. भैरप्पा**

आंदोलने, सामाजिक विषय हे तात्कालिक असल्यामुळे त्यामधून प्रभावी साहित्यनिर्मिती होणे शक्य नाही. म्हणूनच साहित्यिकांनी कोणत्याही विचारसरणीच्या आहारी जाऊ नये. त्यापेक्षा मानवी प्रश्नांवर आधारित लिखाण केल्यास ते चिरकालीन ठरेल, असे मत ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांनी व्यक्त केले. 'पाथफाईंडर' या पुस्तक विक्री दालनामध्ये आयोजित वार्तालापादरम्यान ते बोलत होते. डॉ. भैरप्पा यांच्या साहित्याच्या अनुवादक उमा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.

मानवी प्रकृती, मूल्ये आणि विश्वासार्हतेचा शोध साहित्यामधून घेतला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून डॉ. भैरप्पा म्हणाले की, असा प्रयत्न करताना 'साहित्य रसा'ची निर्मिती होते. त्यामुळेच साहित्यामधील अनुभव वाचकाला आपलासा वाटतो. अर्थात, या प्रयत्नामध्ये अंतर्मनाची मशागत करण्याचेही काम होतेच. लेखकाने कोणतीही चळवळ, विचारसरणीचे भक्ष्य बनू नये. त्यापेक्षा मानवी प्रश्नांवर लिखाण करावे. त्यामुळेच साहित्याद्वारे जीवनाचा खरा अर्थ शोधण्याचा हेतू सफल होईल. कोणतीही विचारसरणी किंवा चळवळीच्या आहारी गेल्यास साहित्यिकाला हे ध्येय गाठणे शक्य होणार नाही.


## स्पर्धा निकाल- नोव्हेंबर २००२

१. बातचीत - अतुल सिंधये
२. यशस्वी भारतीय लेखक - डॉ. प्रतिभा राय
३. तरुण साहित्यिकांना लाख मोलाचे वाटेल असे पु.ल. देशपांडे यांचे पत्र
४. सर्वोत्तमाचा ध्यास घेतलेले दातृत्त्वशील - अण्णा साठे.
५. टोकियोच्या विमानतळावर मला भेटलेला एक पार्लेकर. - भा. द. खेर
६. तरुण साहित्यिकांना लाख मोलाचे वाटेल असे पु. ल. देशपांडे यांचे पत्र.
७. जाहिरात इचलकरंजी जनता सहकारी बँक लि. इचलकरंजी.
८. माझ्या आयुष्यातील एक भाग्य योग - बापूसाहेब झपके.
९. हिंदी मराठीतील आखाड सासू - ललिता पवार
१०. सरस्वतीचे संस्कार करणारे - अनंत अंतरकर
११. इंग्रजी बेस्टसेलर्स मधील 'बेस्ट' - जॉन ग्रिशॅम
१२. अध्यात्ममार्गी कुशल स्त्रीरोग तज्ज्ञ - डॉ. फडणीस.
१३. विज्ञान हा विषय कधीच कालबाह्य होणार नाही. -बातचीत - निरंजन घाटे
१४. सृजनशील आनंद यात्रकाची विविध रूपे - रवींद्रनाथ टागोर

**विजेत्या स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन**

| | | |
|---|---|---|
| सुभाष रावजी केळकर<br>१ ऋणानुबंध, मॉडेल कॉलनी<br>शिवाजी नगर पुणे - १६ | जागृती विद्यालय<br>पाचोरा, जि. जळगांव<br>जळगाव - ४२४२०१ | योगेश वसंत हरकरे<br>अे-२-६६६,<br>पेट्रोकेमिकल्स टाऊनशिप,<br>नागोठणे, जिल्हा रायगड २५ |

आपण आपल्या पसंतीची १००रु. किमतीची पुस्तके कळवावीत.
आमचा पत्ता - मेहता मराठी ग्रंथ जगत, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०




**पुस्तक परिचय**

# संभव-असंभव

*** छाप की काटा ?**
*** मुलगा की मुलगी ?**
*** जॅकपॉट लागणार का ?**
**अशा प्रश्नांची उत्तरे शोधणारे शास्त्र**


**के. डी. पावटे**

* जुगारात यश मिळण्याची शक्यता कितपत याचे गणिती सूत्र मांडता येणे शक्य आहे!
* मी घेतलेल्या लॉटरीच्या तिकिटाला बक्षीस मिळेल का ?
* वर्ल्ड कपमध्ये यावेळी कोण अजिंक्यपद मिळवणार ?
* प्लेविन मध्ये आज कोणाला जॅकपॉट लागणार ?
* यावेळच्या निवडणुकीत महापालिकेत श्री 'क्ष' यांना यश मिळणार का ?
* क्ष शेअर्समध्ये गुंतवणूक केली तर या तिमाहीत लाभ होईल का ?
* यंदा परदेशपर्यटनाचा योग माझ्या कुंडलीत आहे का ?
* माझे मुख्यमंत्रीपद किती दिवस टिकेल ?

या सारखे प्रश्न आपल्याला पडतात; आणि त्याची उत्तरे शोधण्यासाठी ज्योतिषी, भविष्यवेत्ते, तांत्रिक-मांत्रिक, अंकशास्त्रज्ञ वगैरेंकडे अनेकजण जातात; आणि बहुतांशी या लोकांकडून आपली फसवणूक होण्याची शक्यताच जास्त असते. एकतर मुलगा होईल की मुलगी यासारख्या 'छाप की काटा' खाक्यातील प्रश्नाचे कोणतेही उत्तर दिले तरी ते पन्नास टक्के बरोबर असतेच. त्यामुळे कोणीही काहीही सांगितले तरी त्यात 'अर्धवट' तथ्यांश असतोच. यश मिळणार की अपयश यासारख्या प्रश्नाचे उत्तरही याच धाटणीचे असते. परंतु जेव्हा एकापेक्षा अनेक पर्याय असतात, तेव्हा अशी नेमकी उत्तरे देणे हे गुंतागुंतीचे ठरते. प्लेविन सारख्या लॉटरीत एक ते दहा आणि एक ते शंभर यामधील तीन तीन पर्याय निवडायचे असतात. आणि लक्षावधी स्पर्धक त्यात भाग घेत असतात. त्यामुळे अमुक नंबरांचाच मटका हमखास लागेल असे सांगता येणे अवघड ठरते. जॅकपॉटच्या रकमा त्यामुळेच कोटीच्या घरात असतात.

जुगार खेळणे, निवडणुका लढवणे, थोड्या श्रमात जादा कमाई करण्यासाठी काही शॉर्टकट निवडणे, पैज लावणे वगैरे प्रकार हे माणसाच्या रक्तातच भिनलेले आहेत. प्रत्येकजण त्यासाठी काही स्वत:चे ठोकताळे बसवतो; त्यामुळे हे सर्व प्रकार केवळ एकेकाच्या लहरीवर चालतात असे म्हणूनही आता भागत नाही. अशा जुगाराच्या खेळांचाही दीर्घकाळ अभ्यास करून, त्याबद्दल गणिताच्या आधारे काही ठोकताळे बसवण्याचा प्रयत्न चालू आहे; आणि त्यातूनच संभाव्यतेच्या नियमांचा उगम झालेला आहे. 'प्रॉबेबिलिटी' चे अनेक नियम बसवण्यात





## अर्थशास्त्र, तंत्रज्ञान,सामाजिक शास्त्रे, वैद्यक, अभियांत्रिकी,क्रीडा, द्यूत या सर्वांना व्यापून उरणारी संभाव्यतेची संकल्पना

आले आहेत. केवळ जुगाराबाबतच नव्हे तर **अर्थशास्त्र, सामाजिकशास्त्र, जैवतंत्रज्ञान, वैद्यक, अभियांत्रिकी, क्रीडा, व्यापार उद्योग यात संभाव्यता या संकल्पनेचा पदोपदी वापर होतो.**

या ज्ञानशाखेबद्दल माहिती देणारे 'संभव-असंभव' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. ए मॅटर ऑफ चान्स या मूळ इंग्रजी पुस्तकाचे हे भाषांतर आहे.

* संभाव्यता म्हणजे केवळ योगायोग किंवा छाप की काटा, मुलगा की मुलगी, हो की नाही एवढ्यापुरती मर्यादित निवड न राहता, अनेकविध पर्यायांमधून काही विशिष्ट संकेत शोधण्यापर्यंत तिची झेप जाऊ शकते. संभाव्यता म्हणजे 'आपल्या विश्वास ठेवण्याच्या प्रवृत्तीचे प्रमाण' असेही म्हणता येते.

* संभाव्यतेची संकल्पना ही एक प्रकारे प्रतीकात्मक आहे.

* अनेक फलनिष्पत्ती होऊ शकणाऱ्या दृक् घटनांचे वर्णन करण्यासाठी ही संकल्पना आपण निर्माण केलेली आहे.


* योग्य त्या युक्तिवादाचा अथवा तर्कशास्त्राचा वापर करून संभाव्यतेच्या मोजमापासाठी योग्य पद्धतीचे आकलन होण्यासाठी पियरे सायमन मार्क्विस डी लाप्लास (१७४९ - १८२७) या फ्रेंच गणिततज्ज्ञाने प्रथम काही ठोकताळे बसवले.

* लाप्लासने 'अनुभवपूर्व' संभाव्यतेची व्याख्या विशद केली. उदा. नाणे उडवल्यावर छाप व काटा यार्पकी एका अवस्थेतच ते खाली पडणार. येथे दोन वेळा नाणे उडवल्यास छाप किंवा काटा येण्याची शक्यता पन्नास टक्के आहे. हे आपणास 'अनुभवपूर्व' पद्धतीद्वारे ठाऊक असते. आपल्या सामान्य ज्ञानाद्वारे हे आपण सांगू शकतो.

* आता हीच संभाव्यता शंभर वेळा नाणेफेक केल्यास नेमकी पन्नास टक्के राहील का? असा प्रश्न पडला तर ? तशी शक्यता कमी असते. समजा ५१ वेळा छाप आला आणि ४९ वेळा काटा आला तर त्यांची सापेक्ष वारंवारता (रिलेटिव्ह फ्रिक्वेन्सी) अनुक्रमे ०.५१ आणि .४९ आहे असे म्हणावे लागेल.

* हाच प्रयोग २००० वेळा केला तर छाप काट्याची वारंवारता अनु.०.४९५ आणि ०.५०५ आढळली, तर दोन्ही प्रयोगांतील वारंवारता सारखी नाही हे लक्षात येईल. संभाव्यतेकडे म्हणूनच सापेक्ष वारंवारता या भूमिकेतून पाहणे इष्ट ठरते.

* सापेक्ष वारंवारता म्हणजे संभाव्यता असे सूत्र मांडले खरे, पण त्यावरही एक आक्षेप घेतला जातो. यामध्ये प्रयोगाची यादृच्छिकता (रँडमनेस) गृहीत धरलेली असते. प्रत्येक प्रयोगाची सर्व परिस्थिती सारखी असेल तरच त्यांचे निष्कर्ष पुन:पुन्हा एकसारखे येतात. परंतु तसे दरवेळी असेलच असे नाही.



## अनेकविध पर्यायांमधून काही विशिष्ट संकेत शोधण्यासाठी संभाव्यतेच्या सिद्धांताचा प्रभावी वापर शक्य

* संभाव्यतेची तिसरी व्याख्या ही एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीच्या अनुभवसिद्ध किंवा अंत:स्फूर्त मनावर आधारित 'आत्मनिष्ठ' असू शकते.
  परंतु या सर्वसामान्य प्राथमिक पायावर एक मोठी ज्ञानशाखा उभी राहिली आहे आणि उद्योगधंद्यातील अनेक निर्णय या शाखेच्या आधारावर घेतले जातात. अब्जावधी रुपयांचे व्यवहार संभाव्य मागणी-पुरवठा समतोलावर केले जातात.
  संभाव्यतेच्या या सूत्रांवर अनेक क्षेत्रात संशोधकांनी मोलाची भर घातली.
* वायूच्या एखाद्या रेणूचा वेग विशिष्ट असण्याची संभाव्यता ही त्या रेणूचे वस्तुमान आणि वायूचे तापमान यावर अवलंबून असते;वेगाची संभाव्य किंमत ही कमी तापमानास कमी, जास्त तापमानास जास्त असते. सर्वसाधारण तापमानामध्ये हायड्रोजन वायूच्या बाबत ही किंमत १५०० मीटर/सेकंद इतकी असते. नायट्रोजनच्या बाबतीत रेणूंच्या वेगांची संभाव्य किंमत ५०० मीटर/सेकंद इतकी असते. याबाबत जेम्स क्लार्क मॅक्सवेल. (१८३१ - १८७९) याचा मॅक्सवेल्स डिस्ट्रिब्युशन (वितरण) सिद्धान्त प्रचलित आहे. हा सिद्धान्त पुढे प्रयोगानेही सिद्ध होत गेला.
* लुई डी ब्रॉली (१८९२ - १९८७) या फ्रेंच शास्त्रज्ञाने १९२६ मध्ये प्रकाशाप्रमाणेच पदार्थही कण व लहरी या स्वरूपात असतात असा सिद्धान्त मांडला.
* क्लिंटन डेव्हिसन (१८८१ - १९५८) आणि लेस्टर जर्मर (१८९६ - १९७१) या दोघांनी ब्रॉलीच्या सिद्धान्ताला प्रायोगिक जोड देऊन पदार्थाच्या प्रोटॉन - इलेक्ट्रॉन कणांशी लहरी निगडित असतात, ही कल्पना वस्तुस्थितीनिदर्शक असल्याचे सिद्ध केले. इलेक्ट्रॉनचा एक झोत जर एखाद्या स्फटिकाने परावर्तित केला तर त्या झोताचे वक्रीभवन होते हे दाखवल्याने पारंपरिक मेकॅनिक्स या शाखेची जागा वेव्ह (तरंग) मेकॅनिक्सनने घेतले.


या पदार्थ तरंगाचे वर्णन करणारे गणिती सूत्र इर्विन श्रॉडिंगर (१८८७ - १९६१) याने मांडले.

मॅक्स बोर्नने संभाव्यता (अँटिट्युड) या संकल्पनेची त्याला जोड देऊन, तरंगाच्या लांबीत कोठेही कण सापडण्याची संभाव्यता एकूण १ एवढी असते असे दाखवले.

वेर्नेर हायसेनबर्गने (१९०१ ते १९७६) अनिश्चिततेचे तत्त्व मांडून ती अनिश्चितता कमीतकमी कधी होईल याबाबत संशोधन केले. या सर्वाचा उपयोग अणुकेंद्रातून बाहेर पडणाऱ्या किरणोत्साराचे आणि टनेल डायोडचे कार्य कसे चालते हे समजून घेण्यासाठी होऊ लागला.

ग्रेगॉर मेंडेल (१८२२ - १८८४) याने वाटाण्याच्या तीस हजार रोपांवर प्रयोग करून, पुढील पिढीत कोणते गुणधर्म कशा प्रकारे येतील याचा अभ्यास केला. त्यातून आनुवंशिक आकृतिबंधाबद्दल अनेक ठोकताळे बसवणे शक्य झाले.





## सर्वच क्षेत्रांना कवेत घेऊ पाहणारी संभाव्यतेची संकल्पना भविष्यकालीन धोरणे ठरवण्यासाठी प्रत्येकाला मार्गदर्शक

गॅलिलिओ, जेरालामो कार्डानो, यांनी फासे, जुगार यांच्या अनुरोधाने संभाव्यतेशी निगडित खेळांविषयी पुस्तके लिहिली. रशियन रौलेट, कॅसिनोतील जुगाराचे खेळ, घोड्यांच्या शर्यती, यात कोण जिंकेल याबाबतही संभाव्यतेचे काही ठोकताळे वेळोवेळी अभ्यासकांनी बसवले.

या सर्व बाबींचा अभ्यास हा रंजक आणि उद्बोधक आहे.


- आणि आजच्या प्रगत तंत्रज्ञानाच्या जगात संभाव्यतेच्या संकल्पनेचा वापर प्रत्येकच क्षेत्रात होत आहे.

* एका स्टेशनात दर पाच मिनिटांनी लोकल येते. स्टेशनात प्रवेश केल्यापासून आपल्या मित्राला दोन मिनिटाच्या आत गाडी मिळावी. अशी शक्यता किती प्रमाणात आहे ? यासारख्या प्रश्नाची उत्तरेही या सिद्धान्तांद्वारे काढता येतात.
* विशिष्ट मालाचे उत्पादन करण्यासाठी हजार प्रकारचे पार्टस लागत असतील, तर त्यांच्या पुरवठ्याचे वेळापत्रक कसे आखावे ? जास्त लागणारे पार्टस, कमी लागणारे पार्टस,... कमीत कमी काळ गुंतवणूक व्हावी, पार्टस दीर्घकाळ गोडाऊनमध्ये पडून राहू नयेत, भांडवल गुंतून राहू नये - वगैरे बाबींचा विचार करून संभाव्य पुरवठ्याचे वेळापत्रक आखणे फायदेशीर व बचतकारक ठरते.
* बिलियर्डच्या टेबलावर बिलियर्डचे दोन चेंडू एकमेकावर आदळतात. त्यांची टक्कर होण्यासाठी किती ऊर्जा, किती गती अपेक्षित आहे ? गती, हलण्याची दिशा व संवेग या द्वारे ऊर्जेच्या स्थिरमूल्याचा नियम लावला तर टक्कर - प्रक्रियेतील सर्व तपशील आपण जाणून घेऊ शकतो.
* नौदलाची पोलारिस क्षेपणास्त्रे पाणबुडीवरून सोडण्यात येतात. निर्धारित वेळात या बद्दलची योजना पूर्ण करण्यासाठी प्रोग्रॅम इव्हॅल्युएशन अँड रिव्ह्यू टेकनिक (पीई आर टी) हा कार्यक्रम तयार करण्यात आला. आता त्याचा वापर उद्योगधंदे व शासकीय यंत्रणा सरसहा करतात. पीईआरटी तक्ता नसेल तर कोणत्याही प्रकल्पाचा आराखडा मंजूर होत नाही.

...संभाव्यतेची ही ज्ञानशाखा आता सर्वच क्षेत्रांना आपल्या कवेत घेऊ पाहत आहे. त्याबद्दलची प्राथमिक व मूलभूत माहिती असणे प्रत्येक व्यावसायिकाला उपयुक्त व उपकारक ठरते. आपल्या व्यवसायात उपलब्ध मनुष्यबळ, कच्चा माल, तयार उत्पादन, आणि लागणारा वेळ. यांचा फायदेशीर मेळ घालण्यासाठी अपेक्षित कालावधी (टीई) = (कार्यपूर्तीसाठी लागणारा आदर्श अवधी टीए + ४ सर्वात शक्य वेळ टीएम + प्रकल्पपूर्तीसाठी लागणारा जास्तीत जास्त कालावधी) याचा एक षष्ठांश असे सूत्र आहे.

सायन्सवरचे हे पुस्तक, पण सर्वसामान्य वाचकांनाही ते रंजक वाटेल.

**पृष्ठे : १०८ किंमत : ८० रु. सभासदांना : ६० रु. पोस्टेज : २० रु.**




# असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व

**आपल्या मुलाची आत्मप्रतिमा त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी आणि आवडीनिवडीशी सुसंगत असावी यासाठी सुजाण पालकांनी दक्ष राहायला हवे**

**डॉ. रमा मराठे**

पूर्वी कुटुंबे मोठी असत. अनेक घरात दरवर्षी पाळणा हले. संततिनियमनाची साधनेही प्रचलित नव्हती. त्यामुळे देवाचे देणे म्हणून अपत्यसंभवाकडे पाहिले जाई. घरात भरपूर मुले असल्याने त्यांच्या देखभालीकडे फारसे लक्ष देण्याची गरज नसे. मोठी भावंडे धाकट्या भावंडांकडे लक्ष देत. आजकालसारखी नोकरीधंद्यात तीव्र स्पर्धा नव्हती आणि विशिष्ट करीयर करायचे म्हणून लहानपणापासूनच मुलांचा वा पालकांचा आग्रहही नसे.

- आजचे वातावरणच एकूण वेगळे आहे.

बहुतेक कुटुंबात 'हम दो - हमारे दो' हा सत्तरीतला नियोजन मंत्रही मागे पडून 'हम दो - हमारा एक' हा परिपाठ ठरला आहे. एकच अपत्य असल्याने आपल्या सगळ्या आशाआकांक्षांचे आणि भावी स्वप्नांचे ओझे त्याच्या शिरावर लादण्यात पालक तत्पर असतात. त्यामुळे त्या अपत्याने सर्वगुणसंपन्न व्हावे, शाळाकॉलेजात चमकावे, कलाकौशल्यात प्रवीण व्हावे, नोकरीत उच्च स्थान मिळवावे, विपुल धनदौलत कमवावी, नावलौकिक संपादन करावा असे प्रत्येक पालकाला वाटते. आपल्या मुलाची क्षमता, त्याची आवडनिवड, त्याची इच्छाआकांक्षा, त्याची आंतरिक प्रवृत्ती - प्रेरणा याची दखल घेण्याची गरज अनेक पालकांच्या ध्यानीमनीही नसते. त्यामुळे चित्रकलेची आवड असणाऱ्या मुलाला पालक आपल्या हौसेखातर किंवा हट्टाखातर शास्त्रज्ञ बनवू पाहतात; संगीतात गती असणाऱ्या आपल्या मुलीला डॉक्टर बनवण्यासाठी उतावीळ होतात; साहित्यात रुची असणाऱ्या, प्रतिभेचे वरदान लाभलेल्या मुलाला घराण्याच्या व्यवसायात गुंतवू पाहतात... आणि कळत नकळत त्याच्या व आपल्या कौटुंबिक जीवनात नवनवीन समस्या उभ्या करीत राहतात.

लक्षात खरंतर हे घ्यायला हवे की प्रत्येक मूल हे स्वत:चे एक विशिष्ट व्यक्तिमत्त्व व आवडीनिवडीचे पॅकेज घेऊन जन्माला आलेले असते; आणि आपल्या त्या जन्मजात स्वभाव प्रवृत्तीशी मिळतेजुळते जीवन जगण्याची संधी मिळाली तर ते सर्वांगी बहरू शकते. चांगल्या प्रकारे आपल्या आवडीच्या क्षेत्रात रमू शकते. सुखी समृद्ध होऊ शकते. त्याच्या पालकांनी त्याला त्याच्या कलाप्रमाणे जगू द्यावे. आपल्या अतृप्त आशाआकांक्षांच्या पूर्ततेचे माध्यम वा साधन म्हणून त्याच्याकडे पाहून त्याला जगायला भाग पाडू नये.





## 'सुयोग्य आत्मप्रतिमा'ही मुलांना तुम्ही, फक्त 'तुम्हीच'देऊ शकाल अशी अमूल्य सर्वोत्तम देणगी होय!

- त्यासाठी सुजाण पालकत्वाची भूमिका पालकांनी बजावायला हवी.

मुलांच्या संतुलित भावनिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक व शारीरिक विकासासाठी आणि त्यांच्याबाबत समस्या एक तर उपस्थित न व्हाव्या म्हणून किंवा उपस्थित झाल्यास वेळीच योग्य प्रकारे सोडविण्यासाठी हे सुजाण पालकत्व आवश्यक ठरते.

त्यासाठी बेळगावच्या डॉ. रमा रविकिरण मराठे यांचे 'असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व' हे पुस्तक उपयुक्त व उद्‌बोधक ठरेल. या पुस्तकाची तिसरी आवृत्ती नुकतीच मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाली आहे. डॉ. रमा मराठे यांची स्वभावाला औषध आहे (होमिओपॅथीमधील डॉ. बाख प्रणीत पुष्प औषधींची माहिती), रंग सुखाचे (रंगाचे मानसशास्त्रीय प्रभाव व उपयोग), हसत जगावं (ताणतणाव कमी करण्यासाठी आधुनिक वैद्यकशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान यांचा वापर करण्याचे तंत्र), ही तीन पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्याच मालिकेतले हे चौथे पुस्तक बालसंगोपन आणि व्यक्तिमत्त्व विकास याबाबत काही लक्षवेधक सूत्रे स्पष्ट करणारे आहे.

पालकांचे मुलांशी वर्तन व संवाद, मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दिशा, मुले आणि अभ्यास, मनोरंजनातून व्यक्तिमत्त्वविकास अशा चार मुख्य आशयकेंद्रांच्या आधारे डॉ. रमा मराठे यांनी आपल्या विषयाची मांडणी केली आहे.

पालकांनी मुलांना प्रथम सुयोग्य अशी आत्मप्रतिमा देण्याची गरज आहे; कारण प्रत्येकजण हा बहुतांशी आपल्या आत्मप्रतिमेशी सुसंगत वागत असतो असे आढळून येते.

ही आत्मप्रतिमा चुकीचीही असू शकते; आणि शेकडा ९० टक्के लोक चुकीची आत्मप्रतिमा घेऊन वावरल्याने अकारण अयशस्वी किंवा दु:खी होतात.

सुजाण पालक आपल्या मुलाची आत्मप्रतिमा ही त्याच्या व्यक्तिमत्त्वाला व आवडीनिवडींना साजेशी असावी असा प्रयत्न करतात.

आत्मप्रतिमा काय आहे याच्याशी भावी जीवनातील यश, वृत्तिप्रवृत्ती, समाज संवाद, परिश्रम व प्रतिष्ठा यांचा निकटचा संबंध असतो असे दिसून येते.

सुजाण पालक बनण्याची आंतरिक इच्छा हवी. ती असेल तर तुम्ही तुमच्या मुलांना पुढील गोष्टी द्यायला हव्यात. त्यासाठी ॲक्शन प्लॅन हवा.

१. सुयोग्य आत्मप्रतिमा
२. उत्तम व्यक्तिमत्त्व
३. जीवनविषयक सुगम तत्त्वज्ञान
४. गुणरोपण, गुणवर्धन आणि दोष निर्मूलन
५. चांगले कौटुंबिक वातावरण
६. शक्य तेवढे समृद्ध जीवन

आमचा अमिताभ सर्व भाज्या खातो, शाळेतून आल्यावर दप्तर जागेवर ठेवतो, रात्री



## आपल्या वागण्यबोलण्यातून मुलांना प्रेम, विश्वास, दोषांसकट स्वीकृती, गौरव प्रतीत होईल याची काळजी घ्या.

दात घासूनच झोपतो, पाहुण्यांशी छान गप्पा मारतो, अभ्यास करून मगच टीव्ही बघतो - यासारख्या विधानांनी आपला मुलगा योग्य ती कृती करणारच असे त्याच्या व इतरांच्या मनावर ठसवले जाते. मुलाने जी कृती करावी असे वाटते ती कृती त्याला सोपी वाटायला हवी. उदा. पुस्तके वह्या व्यवस्थित ठेवण्याची अपेक्षा असेल तर त्यासाठी शेल्फ, कपाट, खोके - काहीतरी हवे. तरच तो ती कृती करू शकेल. त्याबाबत काही अडचण असेल तर ती दूर करायला हवी.

मुलांच्या प्रत्येक चांगल्या कृतीचे त्याला समजेल अशा प्रकारे इतरांजवळ कौतुक करा. चुकांबद्दल बोलण्यापेक्षा सकारात्मक कृतींबद्दल बोला. सतत दूषणे दिल्याने मुले कोडगी बनतात. तुम्ही त्याच्यावर प्रेम करता, हे त्याला समजले पाहिजे. अर्थात कौतुक करतानाही योग्य गोष्टीसाठी ते करा. चुकांबद्दल शिक्षा करताना मुलाला सुधारायचे आहे हे उद्दिष्ट समोर ठेवा. अपमानकारक बोलणे, मारहाण करणे यातून ते साध्य होणार नाही. वेळेच्या नियोजनाचेही महत्त्व त्याच्या मनावर बिंबवा.

'मी सांगतो ते ऐक, नाहीतर -' 'तुला काय करायचं ते कर' 'आपण पाहू या बद्दल काय करता येईल ते -' या तीन वाक्यांतून पालकत्वाच्या तीन वृत्ती प्रकट होतात. मुलांवर वर्चस्व गाजवणे, त्यांना अनिर्बंध स्वातंत्र्य देणे या दोन्ही गोष्टी त्याज्यच! मुलांबरोबर बरोबरीच्या नात्याने, सहजसंवाद साधत वागणे हेच श्रेयस्कर !

काही वेळा समंजस भूमिका घेऊनही मुले पालकांचे ऐकत नाहीत; तेव्हा काय करायला हवे ? मुलांना बदलण्यासाठी पालकांनीही बदलायची तयारी ठेवायला हवी असे डॉ. रमा मराठे सांगतात. उदाहरणार्थ, आशिष टेपरेकॉर्डरशी खेळत राहतो. तो बिघडेल म्हणून तुम्ही अस्वस्थ असता. हात लावू नको म्हटले तर ऐकत नाही. अशा वेळी एक तर टेपरेकॉर्डर त्याच्या हाती लागणार नाही असा ठेवा किंवा टेपरेकॉर्डर नीट कसा हाताळावा याचे शिक्षण त्याला द्या. म्हणजे तोडमोड टळेल. मुलांना अधिकार द्या; होकारार्थी व सुस्पष्ट सूचना द्या. संयोजन शिकवा, कृतीतून सांगा, समस्या हळुवारपणे हाताळा.

'मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दिशा' या प्रकरणात अनेक विषयांचा उहापोह केला गेला आहे. मुलांवर जबाबदाऱ्या टाका, त्यांना कुटुंबाचा जबाबदार घटक बनवा, प्रेमातील भागीदार बनवा, त्यांच्या आत्मगौरवाची जपणूक करा, त्यांचे व्यक्तिमत्त्व समतोल व्हावे म्हणून प्रयत्न करा.

बुद्धिमान, कल्पक, हुशार मुलांच्याही समस्या असतात.

शालेय वयात मुलांच्या जीवनात अभ्यास, परीक्षा, यांना केंद्रस्थान असते. त्यासाठी वेळेचे नियोजन, वाचनाचे तंत्र, अभ्यासाचे तंत्र, स्मरणशक्तीचा विकास, व्यायाम व खेळ यांकडेही लक्ष देणे इष्ट व आवश्यक असते. खेळ, खेळणी, टीव्ही, कथाकथन व श्रवण, यातूनही





## प्रेम, कौतुकाची नजर, प्रोत्साहनाची पाठीवर थाप या गोष्टींनी तुम्ही सहज मुलांची कोवळी मने वळवू शकाल.

व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. त्यासाठीही पालकांनी योग्य ती दक्षता घेणे आवश्यक ठरते.

पालकत्वाची जबाबदारी पार पाडताना मानसिक चिंता, ताण, अपराधीपणा इत्यादी नकारात्मक भावनांचा बोजा आपल्या मनावर असू नये. मुलांना वाढवण्याचा अनुभव आनंददायी व क्रियाशील ठरावा असा डॉ. रमा मराठे यांचा आग्रह आहे. त्यासाठी शेवटी परिशिष्टात पालकांसाठी प्रश्नावलीही दिली आहे.

आपल्या अपत्याने आपल्या कुटुंबाचे आणि स्वत:चे नाव रोशन करावे असे वाटत असलेल्या प्रत्येक पालकाने हे पुस्तक वाचायलाच हवे.

**पृष्ठे : १७० किंमत : १२० रु. सभासदांना : ९० रु. पोस्टेज : २० रु.**

# स्पर्धा निकाल - डिसेंबर २००२


**१. टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट - जेफ्री आर्चर**
**२. महाश्वेता - सुधा मुर्ती**
**३. द सिस्टर हुड - कॉलिन फोर्बस्**
**४. द गॉड ऑफ स्मॉला थिंग्ज - अरुंधती रॉय**
**५. ज्युरासिक पार्क - मायकेल क्रायटन**
**६. देवदास - शरच्चंद्र चट्टोपाध्याय**
**७. फुलांचे बोल - आन्ना साक्से**

### यशस्वी स्पर्धक

**नितीन अष्टेकर** ए/९/०८, ग्रीनलॅण्ड को. ऑप. सोसा.२०/३,कृष्णानगर,चिंचवड पुणे
**जागृती विद्यालय** पाचोरा, जि. जळगांव जळगाव - ४२४२०१
**योगेश वसंत हरकरे** अे-२-६६६,पेट्रोकेमिकल्स टाऊनशिप नागोठणे, रायगड २५

## विजेत्या स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन

आपण आपल्या पसंतीची १००रु. किमतीची पुस्तके कळवावीत.
आमचा पत्ता - मेहता मराठी ग्रंथ जगत, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०




# बंजाऱ्याचे घर

**आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणावर सामोरी आलेली घरे**

**यशोधरा भोसले**

'नाच ग घुमा' या गाजलेल्या आत्मकथनाच्या लेखिका माधवी देसाई यांच्या कन्यांनीही लेखनक्षेत्रात आपली वाटचाल चालू केली आहे. मीरा तारळेकर यांचे आदिमाया वगैरे काव्यसंग्रह निघाले आहेत. यशोधरा भोसले यांनी 'बंजाऱ्याचे घर' या ललित लेख संग्रहाद्वारे आपल्या लेखनगुणांची दिमाखदार पेशकश केली आहे.


या संग्रहातील पाच लेख हे यशोधरा भोसले यांचे वास्तव्य झालेल्या घरासंबंधीचे आहेत. एक महानगरी मुंबईतील अनुभवाशी संबंधित कथा आहे. त्या घरांशी निगडित असलेल्या त्या त्या वेळच्या भावविश्वात घेऊन जाणारे आहेत. आयुष्याच्या एकेका टप्प्याशी रेंगाळणारे आहेत. त्या त्या टप्प्यावरील व्यक्तींवर लक्ष केंद्रित करणारे आहेत. त्या त्या वातावरणात नेणारे आहेत. या लेखात स्मरणरंजन आहे; आत्मकथन आहे; पण त्यातून प्रकट होणारी मानसिकता खूप काही बघून, सोसून, पचवलेल्या प्रगल्भ परिपक्वतेची आहे. पहिलेच पुस्तक असूनही लेखन, वर्णनशैलीतील सहजता व सफाई लुब्ध करणारी आहे.

पहिले घर आहे ते गावाकडचे. पिढ्यानुपिढ्यांपासूनचे. शंभर वर्षांचे. या घरात पूर्वजांच्या पिढ्या वर्षानुवर्षे नांदल्या. डॅमजवळचे कौलारू घर. व्हरांडा. कुंपणाआतले. पायवाटांच्या दोन्ही बाजूंना लावलेली झाडे. क्रोटन, बोगनवेल, कृष्णकमळांच्या वेली.. टेकाडाच्या चढतीची कमान आडवी सरळ होत खडकाळीला भिडते - तिथे झाडीत दडलेले आजीच्या नावाने ओळखले जाणारे घर ...

या घरी यायला कारणे शोधत बसावे लागत नाही. 'या ताई. बॅग द्या पाहू.. म्हटलं, केव्हा येऊन पोचताय ?' असं दिलखुलास स्वागत करणारा भीम सामोरा आला की आपल्या सगळ्या शहरी गरजा, त्यातून उद्भवणारे ताण, काळज्या यांचा पार विसर पडतो आणि या जंगलात वेळी अवेळी दूध मिळत नाही म्हणून चक्क काळा चहाही आवडीने प्यावासा वाटतो. भीमच्या चुलीवर रटरटणारी डाळ आणि भाकरी चटणी अपूर्व आनंद देऊन जाते. दिवसभर सोन्याच्या झाडाखाली किंवा गुलमोहोराच्या कट्ट्यावर...संध्याकाळी तलावाच्या किनाऱ्यावर...वाटले तर लिहावे, वाचावे, आळसात पडून राहावे.. रान मांजरीला कुशीत घेऊन पहुडावे.

या जंगलातल्या घरी कधी वारूळातून बाहेर पडणाऱ्या लखख चंदेरी रंगाचे, दंडभर






## निर्वचनीय निसर्गशक्तीशी तादात्म्याचा अलौकिक अनुभव देणारे वनराईतले पिढीजात कौलारू घर...आजीचे घर..


जाडीचे. तेजस्वी नागमोडी शरीर संथपणे सळसळताना दिसते. आणि त्याच्यावरून दृष्टी हटवणे अशक्य ठरते. त्याच्याकडे पाहताना वाटते की, धरणीच्या गर्भातल्या खोल विवरात, भुईतल्या जीवनरसावर जगत समाधिस्थ होऊन साधना करून परिपक्व झालेल्या, मस्तकातल्या चिरंतन मण्यात जीवनरहस्य धारण करणाऱ्या या तेज:पुंज देहाच्या दर्शनाने हजारो हिरकण्यांचा खच पडावा तसं अवघा आसमंत उजळून निघत आहे..काहीतरी अद्‌भुत, अलौकिक बघितल्याची जाणीव मनात जागी होत आहे...

या घरात आल्यावर आयुष्य सोपे होऊन जाते. मावशी, भीम, रखवालदाराची मुले... चांदण्या रात्री नीरव शांतता. तेजाने झगमगणारे ढगांचे तिहेरी पट्टे... चंद्र ढगातून बाहेर आल्यावर दिसलेले दैदीप्यमान वर्तुळ...त्या उधळणाऱ्या तेजाने भारून गेलेले वातावरण...दत्तजयंतीच्या त्या दिवशी हातावर कोणीतरी ठेवलेला प्रसाद...सगळे ताण कमी होत जातात, चिडचिड कमी होते. मन हलके, आनंदी होते. उत्सुक होते. आयुष्याचा परीघ तोच असतो, पण आपण अंतर्बाह्य बदललोय असा अनुभव येत राहतो...शरीराचा कण न कण विरघळून जात त्या अवकाशात विलीन होत जातो. आकाश, भुई, पाणी यांच्यातल्या आणि आपल्या त्यांच्यातल्या सीमा धूसर होत जातात...शांतता...फक्त शांतता...दुसरे काहीच नाही...मी...माझे...मला...सगळे गळून पडते.

... निर्वचनीय निसर्गशक्तीशी तादात्म्याचा असा अनुभव देणारे **ते जंगलातले पिढीजाद कौलारू घर...जगातली सगळी सुखे, मोह, प्रलोभने बाजूला सारून एखाद्या बंजाऱ्यासारखे येण्यासाठी आवाहन करणारे...निर्भय, मुक्त होऊन जगायला सिद्ध करणारे...**

दुसरे घर भेटते ते माहेरचे. गोव्यातले. बांदोड्याचे. महालक्ष्मीच्या देवळाच्या परिसरातले. सभामंडप, नगारखाना. आगरशाळा. मंदिराच्या भटांची घरे; पाण्याची तळी...त्या शेजारचे दणदणीत दगडी चिऱ्यांचे भक्कम लाकडी प्रवेशद्वाराचे घर... पोर्तुगीज पद्धतीचे त्याचे अंगचे कुलूप आणि त्याची भलीमोठी लोखंडी चावी...वर जाणारा वळणदार जिना. वरच्या मजल्यावरची एकुलती एक खोली...उतरत्या कौलारू छपराखाली अर्धगोलाकार दरवाजेवजा खिडक्या...घराच्या पूर्वेकडे प्रचंड वृक्षराज. आश्वासक. थरारक. झाडाच्या पारावर राखणदाराची, 'त्या' च्या असण्याची खूप असणारी दगडी देवळी...या घरात आल्यावर 'आई, काय ग तुझी ही गर्दी' हे मनात येणारे वाक्य यशोधराच्या तोंडून 'काय मस्त दिसतंय घर, माधवीताई' या शब्दांच्या रूपात बाहेर पडते; आणि त्यावर 'अस्सू दे बाई, आमच्चं क्काय आपलं खेड्यातलं घर' असं माधवीताईंचे 'ठसकावून' उत्तर येते...

काटकरांशी लग्न करून गोव्यात आल्यावर येथील सुखासीन जीवनाला उबगलेल्या माधवीताई मुंबईसारख्या शहरात नशीब आजमावायला पतीसह गोवे सोडतात. कल्याणजवळच्या मोहोन्याच्या कंपनीच्या क्वार्टरमध्ये चार खोल्यात हौसेने घर सजवतात...त्या सर्व स्मृतींना या



**सभामंडप, नगारखाना, आगरशाळा, भटभिक्षुकांचा वावर.. महालक्ष्मी देवळाच्या परिसरातले. वळणदार जिन्याचे बांदोडा येथील घर...**

लेखातून उजाळा मिळतो...परंतु काटकरांच्या मृत्यूनंतर आणि रणजित देसाईंच्या कोवाडच्या घरातून बाहेर पडल्यावर, बेळगावमधल्या अल्प वास्तव्यानंतर आपल्या मूळ सासरच्या घरी गोमंतकात येण्याचा निर्णय माधवीताई घेतात आणि वर्षानुवर्षे बंद असलेल्या बांदोड्यातल्या देवळाच्या परिसरातल्या या घराला घरपण देतात.


तिसरे घर आहे ते कोवाडमधले. रणजित देसाई यांचा खानदानी वाडा. 'पप्पांच्या नंतर दादा माझे वडील तर झालेच; पण माझे गुरू, मित्र अन् मार्गदर्शकही झाले. कितीतरी नव्या गोष्टी त्यांनी मला शिकवल्या. मराठी भाषा, साहित्य अन् चित्रकला यांच्याशी माझे हरवलेले नाते त्यांनी पुन्हा जुळवून दिले...पुढच्या आयुष्यातल्या अवघड वळणांवर मला कधीच एकटेपणा येऊ नये, माझी पावले कधी डगमगू नयेत म्हणून केवढे मोठे संचित त्यांनी माझ्या स्वाधीन केले होते ! पण ते करताना त्यांच्याशी माझे असणारे नाते त्यांनी निष्ठुरपणे तोडून टाकले होते. मला माहेरापासून वंचित केले होते. पण मला असे परके करून टाकताना ते स्वत:च आपल्या घरापासून, शेतीपासून, भुईपासून तुटून अनाथ होऊन गेले होते...' (८१) असे दादांबद्दलचे मनोभाव संयतपणे प्रकट झाले आहेत.

चौथे घर आहे ते चित्रकार रमेशच्या स्टुडिओतले. काही काळ जीवनात येऊन गेलेल्या व्यक्तीच्या खोलीचे...भरपूर पसारा. अस्ताव्यस्त. खिडकीतून दिसणारा मशिदीचा दुधट हिरवा मनोरा...त्याच्यापुढची झोपड्यांची छपरे, पत्रे, कौले...बकाल वस्ती, धूळ...माती...रंगात मिसळायला लागणारे पाणीसुद्धा घरात नाही...नळ नाही...बाहेरून सार्वजनिक नळावरून पाणी आणायचे...रमेशच्या रंगरेषा मात्र अफाट जादू...त्यामुळे त्याच्या स्टुडिओत पुन:पुन्हा येऊन चुकतमाकत वेडेवाकडे पेंटिंगचे प्रयोग करण्याची उर्मी अनिवार...

'१२ ए - रेशम' हा टेन परसेंट कोट्यातील फ्लॅट यशोधरा भोसले यांना मिळालेला. तो मिळवण्यासाठी काय काय दिव्य करावे लागले याची हकीकत त्याच शीर्षकाच्या लेखात वाचायला मिळते. बिल्डर कुकरेजा यांनी दिलेल्या वैतागाचेही अनेक किस्से त्यात आहेत. त्याचप्रमाणे मंत्रालयातील भल्याबुऱ्या अनुभवांचेही !

'पत्ता हरवलेलं घर' म्हणजे महानगरी मुंबईतला एक कॉस्मॉपॉलिटन अनुभव आहे. मनोहर - मॉन हा एक फ्रीलान्स पत्रकार. कुलाब्यात तो पेइंग गेस्ट म्हणून एका पारशी कुटुंबात दीर्घकाळ राहत असतो. पण ते कुटुंब त्याला जागा सोडायला सांगते. तेव्हा तो एजंटबरोबर सोयीस्कर फ्लॅटचा शोध घेत राहतो. एक फ्लॅट त्याला मनाजोगा सापडतो. मॉनवर फिदा असणारी शशी. लेक्चरर. तिचे स्वत:चे घर. स्थिरस्थावर. मॉन तिच्याकडे नेहमी येत जात असतो. मॉन ही शशीची एक दुखरी जागा. एकत्र उठणेबसणे - खाणेपिणे. पण त्या पलीकडे त्याच्या आयुष्यात तिला शिरकाव नाही. तसा प्रयत्न केला तर मैत्रीच तुटेल ही भीती. म्हणून ती सावध. सजग... मॉनचा नवा फ्लॅट बघायला ती जाते...त्यातले पडदे वगैरे मॉनच्या नव्याने





**कलावंताचे मन आणि कलावंताची नजर यामुळे निसर्गाचा व परिसराचा प्रत्येक कोपरा दिमाखदार सौंदर्यानिशी समोर येतो.**


भेटलेल्या कधी काळचा मित्र विक्रम याच्या चॉइसने घेतल्याचे कळते तेव्हा शशीला आश्चर्य वाटते.''हा विक्रम याच्या आयुष्यात एवढा महत्त्वाचा कसा झाला ? आणि हा मॉन एवढा अप्पलपोटा कसा झाला ? स्वार्थी... गरज पडली तेव्हा मला कामाला लावलं... आणि...जिथं तू असायला पाहिजेस तिथं विक्रम कसा घुसू शकतो?...'' असा प्रश्न तिला पडतो...

- आणि त्याचा उलगडा होतो तेव्हा मॉनचं हे घर तिला 'पत्ता हरवलेलं घर' वाटू लागतं...

महानगरातल्या नात्याचं एक अनोखं रूप या 'कथेतून' समोर येतं.

'बंजाऱ्याचे घर' मधील हे शेवटचे घर वगळता बाकीच्या सर्व घरांशी लेखिकेचा वैयक्तिक संबंध असल्याने, त्यातील तपशीलांना व्यापक संदर्भ लाभलेला आहे. चित्रतपस्वी भालजी पेंढारकर (आजोबा), लीलाबाई पेंढारकर (आजी), माधवी देसाई-काटकर (आई), स्वामीकार रणजित देसाई (पितृतुल्य दादा), प्रभाकर पेंढारकर (मामा), काटकर (वडील), मीरा तारळेकर (बहीण), जाई (कन्या), वगैरे कुटुंबियांसमवेत इतरही व्यक्तींचे उल्लेख येतात. ''आयुष्यातील अत्यंत अवघड वळणांवर काही घरे मला सामोरी येत गेली. या घरांनी मला हक्काची सावली दिली, निवारा दिला अन त्या काळात अतिशय गरजेचे असणारे स्थैर्य व स्वास्थ्य मिळवून दिले. त्यांचे ते ऋण काही अंशी तरी फेडण्याची निकड प्रकर्षाने वाटत राहिली. त्यातून हे लिखाण आपोआप माझ्या हातून उमटतं गेले.'' असे लेखिकेने म्हटले आहे. त्याच प्रमाणे ''घर हे नेहमीच सजीव असते. ते तिथे राहणाऱ्यांच्या आनंदात, दु:खात सहभागी होत असते...असे चैतन्याने सळसळणारे घर'' फार थोड्या भाग्यवंतांना मिळते असे लेखिकेला वाटते.

एक स्त्री म्हणून काही वेगळी दृष्टीही या लेखांतून दिसते. अमृता प्रीतम यांची 'चौथा कमरा' ही संकल्पना लेखिकेला आवाहक वाटते. पुरुषमंडळींचा दिवाणखाना, स्वयंपाकघर आणि शय्याघर या तीन खोल्यांशिवाय घरामध्ये स्त्रीला स्वत:चा असा कोपरा वा कमरा मिळत नाही. स्वत:शी निवान्त संवाद साधण्यासाठी स्वत:चा हक्काचा फटीएवढा तरी कमरा असावा...थोडासा प्रयत्न केला तर आहे त्या चौकटीत देखील स्त्रीला स्वत:चा अवकाशाचा तुकडा मिळू शकेल...निसर्गाने स्त्रीला जन्मत:च सर्जनशीलता, कार्यक्षमता, सौंदर्याभिमुखता, सहनशीलता व कणखरपणा अंमल जास्तच बहाल केला आहे. त्या शक्तीचा उपयोग तिने स्वत:ची अशी स्पेस मिळवून आपल्या विकासासाठी करून घ्या. सुदैवाने मला अशी स्पेस मिळवून देणारी घरे लाभत गेली. त्यांच्या कडूगोड आठवणी माझ्या मनात साठत गेल्या; आज त्या घरांकडे बघते तेव्हा त्यांचे मोल पुन्हा एकवार माझ्या लक्षात येते. अशी घरे भेटत गेली म्हणून एक यशोधरा मोडकेतोडके का होईना, लिहू लागली. अशा अनेक यशोधरा आपल्या अवतीभोवती आहेत, कधी परिस्थितीशी तर कधी स्वत:शी संघर्ष करीत झगडत त्यांचा प्रवास



## कोवाडमधील रणजित देसाई यांचा खानदानी वाडा..अवघड वळणांवर भावी आयुष्यात पावले डगमगू नयेत म्हणून केवढे मोठे संचित देणारा..

सुरू आहे...'' (पृष्ठ दहा)

स्वत:चे स्त्रीत्व आणि स्वत:ची स्पेस यांचे हे भान या सर्व लेखांना एक आत्मविश्वासपूर्ण बैठक देते. '१२ ए - रेशम' या टेन परसेंट मधल्या फ्लॅटमध्ये राहताना, त्या घराचे आणि आपले सूर चांगले जुळून आल्याचे समाधान त्यांच्या लेखामधून व्यक्त होते. अनेक वर्षांचे असुरक्षिततेचे दडपण नाहीसे होऊन अंगात दुप्पट जोर आल्याचा, कोलमडलेला विश्वास परत लाभल्याचा प्रत्यय येतो. आधीची घरे श्रीमंत, संपन्न होती; पण त्या त्या घरांतील शिस्त, नियम यात माणसाला महत्त्व नव्हते. प्रत्येक सणासुदीला कोणत्या ना कोणत्या कारणावरून टिपे गाळणे...एखाद्या मित्राला घरी आणून एक कप चहा द्यायचाही अधिकार नाही हा तडाखा खाऊन हादरणे...मी इतकी दुबळी, मिंधी होऊन गेले होते, इतके मेलेले चिरडलेले आयुष्य जगत होते याची मला शरम वाटू लागते... अपुरेपणाच्या भावनेने मी तेव्हा गुदमरून जात होते; ते कुणालाच समजत नव्हते...मला तरी ते कुठे नीट समजले होते?...' (पृष्ठ १४१) - असा हा एक प्रदीर्घ प्रवास या घरांद्वारे लेखिकेप्रमाणेच वाचकांनाही घडतो. स्वत्वाच्या जाणिवेचा आणि स्वत्वाच्या साधनेचा ! या नव्या घराने जुन्या घराच्या आठवणींचा विसर पडला, आणि नव्या उमेदीने जगण्याची शक्ती दिली... (१४३) अशी भावना लेखिका प्रकट करते.

कलावंताचे मन आणि नजर या लेखांतील अगणित तपशीलांतून दिसते. त्या त्या घराभवतालच्या निसर्गाची चैतन्यशाली रूपे नजरेसमोर येतात; तशीच एखाद्या चित्रकृतीची सौंदर्यस्थळेही सहजपणे शब्दरूप धारण करतात. अपुऱ्या चित्राला काहीच मनासारखा आकार लाभेना अशा अवस्थेत अस्वस्थ असताना रमेश त्या गिचमिडलेल्या कॅनव्हासवर असे काही फटके मारतो की चित्रविषयाच्या तेजाची प्रभा फाकत जाते. त्याचे तपशील ज्या नजाकतीने येतो, ते विलक्षण प्रत्ययकारक वाटतात. (१०३ - १०४). ढगाआडच्या चांदण्याने उजळलेला आसमंत साक्षात्कारासारखा अंगांगांवर रोमांच आणतो (२१-२२-२३), वारूळातून बाहेर पडणाऱ्या आणि सळसळत दौडणाऱ्या सर्पाचे दर्शन (१५-१६) असेच अलौकिक उतरले आहे.

या घरांच्या निमित्ताने अनेक व्यक्ती भेटतात. पप्पा, रणजितदादा, आजी, भीम, रमेश, आई माधवी,...बहीण मीरा, पारो, गीता, कन्या जाई...


त्यांच्या स्वभावाचे कंगोरेही कळतात.

''नो नो नो , अरे मेरा चॉइस देखो...तुम भी साला घाटी क्या याद करेगा ?'' (पप्पांचे उद्गार. पृष्ठ ४२)

पप्पांची चमची मिरा तुरूतुरू चालत आली. (४८)

''हम तभी बॅचलर था...कितना बार तुम्हारे घर आया पार्टी को...कितना बार मम्मीने खाना खिलाया...कैसा है तुम्हारा मम्मी? तुम्हारा सिस्टर्स.. अभी किधर है ? अरे, अरे, रोता





## स्वतःचे स्त्रीत्व आणि स्वतःची स्पेस यांचे भान यशोधरा भोसले यांच्या लेखांना एक आत्मविश्वासपूर्ण अधिष्ठान देते

क्यूँ है ?'' (कॉलनीतल्या तमिळ शेजाऱ्याचे उद्गार. ते घर सोडल्यावर २५ वर्षांनी तेथे गेल्यावर ऐकायला मिळालेले.) (४९) ''

''दादा, तुमच्या मुली होण्यापेक्षा तुमच्या घरातलं कुत्रं झालेलं परवडलं.'' (६८)

पण त्या घराचे खरे श्रीमंतपण तिथल्या सोन्यारूप्यात नव्हते. वेळप्रसंगी गरजेला लागलेच तर एकरकमी पाच हजार रुपये त्या घरातल्या तिजोरीत नव्हते. पण दादा फार मोठ्या वैभवाचे स्वामी होते. (७०)

''तू कशी अगदी मॅच्युअर आहेस ग. बाकीच्या कशा जरा अशातशाच आहेत.'' (यशूला उद्देशून -)

''तुम्हीच माझ्या खऱ्या जिवाभावाच्या'' (मधु-पारूला उद्देशून)

''त्या काय येतात आणि जातात. तूच आमचं फिक्स डिपॉझिट'' (७६). (धाकट्या गीतूला उद्देशून) - अशी दादांची प्रत्येक मुलीबरोबर वेगळी राजनीती चालायची.

''माधवी, गेली बघ पोरं...जावयाची पोरं हरामखोरच !'' (७९).


''इतकं सोन्यासारखं सासर पण तिला नांदायलाच नको. गावाकडे असती तर केसाला धरून फरफटत झोडत घरी नेली असती नवऱ्यानं. यांचं घराणंच असलं आहे.'' माझ्याबरोबर माझ्या सगळ्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेवर असा शेणाचा हल्ला व्हायचा. (१११).

-''ती गोव्याला आली खरी, पण तिच्यावर हल्ले व्हायचे थांबले नव्हते. केवळ साहित्यिक वर्तुळातून नव्हे तर तिला समाजातूनच हद्दपार करण्याचे आटोकाट प्रयत्न पद्धतशीरपणे सुरू होते. ज्या माणसांवर तिने जिवापाड प्रेम केले होते तो प्रेमाचा हक्क तिच्यापासून अत्यंत निर्दयपणे हिरावून घेऊन ती माणसे थांबली नव्हती...उगवणारा प्रत्येक दिवस येणाऱ्या नव्या हल्ल्याची पूर्वसूचना देतच तिच्या समोर येत होता...बाहेर घोंगावणाऱ्या वादळाला तोंड देताना ती आतून हळूहळू सावरत गेली. घट्ट बनत गेली...या घराच्या दगडी चिऱ्यातून तिचे हरवलेले स्वास्थ्य, स्वारस्य तिला सापडत गेले...'' (३७).

असे अनेक रंग या घरांना आणि घरातल्या माणसांना लाभलेले आहेत.

यशोधरा भोसले यांची आपल्या पूर्वायुष्याकडे बघण्याची दृष्टी आता बरीचशी निरामय झालेली आहे. उद्वेग, चिडचिड, अन्याय, दुखरेपण...यातून बाहेर पडून आत्मविश्वासाने स्वत्वाची जपणूक करण्याचे आत्मबळ आता त्यांच्यात आले आहे. त्या आत्मविश्वासाची आणि आत्मबळाची तेजस्वी किनार या पुस्तकातील शब्दाशब्दाला अभिमंत्रित करीत आहे. हे बंजाऱ्याचे घर कदाचित् आपल्याही घराला एक वेगळे घरपण देईल.

**पृष्ठे : १८० किंमत : १५० रु. सभासदांना : ११३ रु. पोस्टेज : २० रु.**




## भाई वैद्य यांना शांतिदूत पुरस्कार

''धर्माचे नाव घेऊन राजकारण करणे मला पातकासारखे वाटते. त्यातून निर्माण होणारा द्वेष दूर करण्यासाठी माणसांना जोडणारी, एकत्र आणणारी बंधुतेची भावना निर्माण करण्यासाठी बुद्धिवादी, ज्येष्ठ नेत्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.'' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी केले.

बंधुता प्रतिष्ठान या संस्थेच्या दशकपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ कार्यकर्ते भाई वैद्य यांना डॉ. फडकुले यांच्या हस्ते 'शांतिदूत'पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या प्रसंगी ते बोलत होते. टिळक आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भालचंद्र भागवत अध्यक्षस्थानी होते.

डॉ. फडकुले म्हणाले, ''बंधुतेचे धागे अलीकडच्या काळात विरळ होत आहेत. देशातील विविधतेला सामावून घेऊन माणसांना परस्परांशी जोडणारे बंधुता हे सूत्र आहे. त्यावर आघात होऊ नये. धर्माचा अर्थ व्यापक आहे. त्याचा संकुतिच विचार करून त्याच्या आधारे राजकारण करू नये, यासाठी जागरूकता निर्माण करायला हवी.''

मनोगत व्यक्त करताना श्री. वैद्य म्हणाले, ''बंधुता हे तत्त्व भारतीय समाजाचा गाभा आहे. माझ्या साठ वर्षांच्या आयुष्यात पहिल्यांदाच फाळणीच्या वेळी नव्हता इतका अविश्वास समाजात दिसत आहे. तो दूर करण्यासाठी जात, धर्म, भाषा यांच्या पलीकडे जाऊन बंधुतेच्या संकल्पनेचा प्रसार करण्याची गरज आहे.''

डॉ. भागवत म्हणाले, ''जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या नाताळाच्या सणाच्या दिवशी हा पुरस्कार प्रदान केला, याला महत्त्व आहे. विषमता दूर करण्यासाठी प्रतिष्ठानचे विविध प्रयत्न सुरू आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठीही काही उपक्रम सुरू होणार आहेत.'' या प्रसंगी प्रेरणा शिक्षण प्रसारक मंडळ (पुरंदर), बंधुता युवक संघ (चिखली) यांना अनुक्रमे 'शांतिदूत' व 'सेवानिष्ठ कार्य संस्था' पुरस्कार देण्यात आले. प्रतिष्ठानच्या निवडक कार्यकर्त्यांनाही या वेळी गौरविण्यात आले. राष्ट्रीय बंधुता समाजाचे उपाध्यक्ष अफजलभाई शेख, बंधुता युवक संघाचे अध्यक्ष विकास रोकडे, प्रेरणा शिक्षण संस्थेचे संस्थापक संचालक प्रा. गौतम बेंगाळे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## पुण्य पर्वतीभूषण पुरस्कार

''संतांनी दाखविलेल्या दिशेने वाटचाल केल्यास आदर्श समाज निर्माण होऊ शकतो. त्यासाठी शिक्षणात संत वाङ्मयाचा समावेश केला पाहिजे'', असे किसनमहाराज साखरे यांनी सांगितले. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पर्वती नागरी कृती समितीतर्फे श्री. साखरे यांच्या हस्ते 'पुण्य पर्वतीभूषण पुरस्कार' देण्यात आले. या वेळी शाहीर योगेश उपस्थित होते.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे, वंदना चव्हाण, शहरात स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबविण्याच्या प्रयत्नांबद्दल डॉ. नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्टचे विश्वस्त चं. ह. जोशी आणि सामाजिक कार्याबद्दल डॉ. सतीश देसाई आदींना 'पुण्य पर्वतीभूषण पुरस्कारा'ने सान्मानित करण्यात आले; तसेच १३० सामाजिक कार्यकर्त्यांना 'पर्वतीभूषण पुरस्कार' देण्यात आला.

श्री साखरे म्हणाले, ''समाजाचे स्वरूप सरळ नसते. समाजात मानसिक विकृतीचे प्रमाण वाढल्यामुळे अज्ञानी व्यक्तींची संख्या वाढली आहे. समाजातील मानसिक स्वच्छतेलाही महत्त्व देण्याची गरज आहे, त्यासाठी सामुदायिक प्रयत्न झाले पाहिजेत.''

या वेळी शाहीर योगेश, श्री जोशी व डॉ. गोऱ्हे यांनी मनोगत व्यक्त केले. संदीप डांगी यांनी सूत्रसंचालन केले. आशिष जराड यांनी आभार मानले.

## श्री. पु. भागवत यांना चतुरंग पुरस्कार

आपल्या अध्यापन कारकीर्दीत विरोधी मत स्वीकारण्याचे स्वातंत्र्य मी विद्यार्थ्यांना सतत दिले. विद्येच्या क्षेत्रात शिष्याने आपला पराजय करावा, हाच गुरूचा श्रेष्ठ गौरव आहे, अशी माझी मनोधारणा राहिली. त्यामुळेच आज लोकसभा अध्यक्षपदापर्यंत पोहोचलेले आपले शिष्य मनोहर जोशी आणि आपल्या राजकीय मतांमध्ये, मनोवृत्तीमध्ये भेद असला, तरी त्यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारण्यात कोणताही विक्षेप येत नाही, अशा शब्दांत ज्येष्ठ संपादक-प्रकाशक श्री. पु. भागवत यांनी चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या.

दादासाहेब मावळंकर यांच्यासारख्या नि:स्पृह लोकसभाध्यक्षांच्या खुर्चीत आज आपला विद्यार्थी विराजमान झाला, याचा मला आनंद आहे आणि या स्थानाला शोभणार नाही, असे काहीही त्यांच्या हातून क्षणभरदेखील कायावाचामनाने न घडो, अशी मनोकामनाही श्रीपुंनी व्यक्त केली.

ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांनी पुरस्कार कोणाच्या हातून स्वीकारावा, याबद्दल केलेल्या मतप्रदर्शनावर श्री. पु. भागवत व मनोहर जोशी यांच्या भाषणांमधून भाष्य होणे, अपेक्षितच होते. एक लाख रुपये रोख, मानपत्र आणि मानचिन्ह अशा स्वरूपाचा हा, यंदाच्या वर्षी वेगळ्या कारणाने बहुचर्चित ठरलेला पुरस्कार 'जय शारदे वागेश्वरी'च्या सुरावटींवर प्रदान केल्यानंतर राजकारणातील सरांनी आपल्या गुरूंना साक्षात श्रीपुंना लोकसभाध्यक्षपदाचे राजशिष्टाचार बाजूला सारून वाकून नमस्कार केला. श्रीपुंच्या मनोगतानंतर मनोहर जोशींनी केलेल्या भाषणात तेंडुलकर यांच्या उद्‌गारांमुळे त्यांना जाणवलेली सल वारंवार डोकावत होती. कोणी बाण मारला, तर लागतो, पण मी आयुष्यात असे एकही अभद्र किंवा दुष्कृत्य केले नाही की, ज्याचा मला पश्चात्ताप व्हावा. आतापर्यंत विविध महनीय व्यक्तींचे सत्कार माझ्या हातून झाले, पण ते सर्व मी या अतिशय पवित्र हातांनी केले आहेत. माझ्या जीवनात अग्निपरीक्षेचे प्रसंग खूप आले, मी अग्निपरीक्षेला कधी घाबरलो नाही, तसा घाबरणारा मी नाही, असे मनोहर जोशी

म्हणाले. खूप चांगले झाले की, कुणाची तरी दृष्ट लागते, असेही ते म्हणाले.

तत्पूर्वी श्रीपुंनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, या पुरस्काराच्या निवड समितीवर सात वर्षे काम केल्यामुळे किती नि:पक्ष वृत्तीने ही निवड केली जाते, हे ठाऊक असल्यानेच संकोच आवरून मी पुरस्कार घ्यायला तयार झालो. शिवाय मनोहर जोशी यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारण्यातला आनंद हेसुद्धा त्यामागचे आणखी एक कारण होते. चार पिढ्यांचे लेखक, कवी, कादंबरीकार, प्रतिभावंत यांच्यामध्ये माझ्या कुवतीनुसार मी सहभागी झालो आणि सजग शोधक वृत्तीने त्यांच्या कार्याचा मागोवा घेतला इतकेच. मात्र त्यामुळे अलौकिक आनंदाचा धनी झालो. आज वार्धक्यातही तो झरा आटलेला नाही, असे श्रीपु म्हणाले.

विविध सामाजिक - सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणारे निष्ठावान सेवाव्रतीच देश वाचवू शकतील, त्यामुळे त्यांना शोधून त्यांचा जीवनगौरव करण्याचे औचित्य आता चतुरंगने दाखवावे व रसिकांनीही त्यासाठी निवड समितीला नावे सुचवावीत, असे आवाहन जीवनगौरव पुरस्काराचे यंदाचे सन्मानमूर्ती श्री. पु. भागवत यांनी रविवारी केले. गतकाळाच्या आठवणींना उजाळा देताना श्री. पु. म्हणाले, स्वातंत्र्यचळवळीत लोकांचे मार्ग भिन्न होते, पण त्यागबुद्धी समान होती. स्वातंत्र्यानंतर काही वर्षात साने गुरुजींना अपेक्षित बलशाली भारत होईल, अशी आशा पल्लवित झाली. पण कधी कोण जाणे, चित्र बदलले. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या वेळी एसेम जोशींनीही 'मरून जावसं वाटतं' असे उद्‌गार काढले. पण या काळ्या चित्राला आजही रुपेरी किनार आहे. अर्पण वृत्तीने जीवन जगणारे स्त्रीपुरुष पुन्हा दिसू लागले आहेत. संख्या कमी आहेत. पण प्रकाश-विकास आमटे, अभय-राणी बंग, अनिल अवचट व त्यांची मुलगी मुक्ता, गिरीश प्रभुणे, विजया लवाटे, डॉ. कलबाग यांच्यासारखी विविध सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी मंडळी आहेत. महात्मा गांधींच्या म्हणण्याप्रमाणे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे मोहोळ पुन्हा गजबजू लागले आहे. असे सेवाव्रतीच देश आणि आत्मा वाचवतील. त्यामुळे अशा निष्ठावान सेवाव्रतींना जागरूकपणे शोधून त्यांचा वेळीच सत्कार करण्याचे औचित्य चतुरंगने यापुढील जीवनगौरव पुरस्कारांमध्ये दाखवावे व रसिकांनीही त्यात सहभागी व्हावे, असे ते म्हणाले.

आपण राजकीय पादत्राणे बाहेर ठेवून या सरस्वतीच्या मंदिरात आलो आहोत, असे मनोहर जोशी यांनी सांगितले. श्रीपु कार्यक्रमाला आले, चतुरंगने कार्यक्रम रद्द केला नाही व रसिकांनीही उपस्थिती लावली, याबद्दल आभार मानून सरांनी आपले टोलेबाज भाषण सुरू केले. जे धोरण स्वीकारले, त्यावर पक्के राहण्यास आपण शिकविले. मराठी माणूस आणि हिंदुत्वाचे धोरण मी स्वीकारले असून कुणाला राग आला, तरी त्याची पर्वा न करता मी ते सोडणार नाही. श्रीपुंचा सल्ला मी पाळीनच. पण गाडी कितीही सरळ चालविली, तरी दुसऱ्याच्या चुकीने अपघात घडले, तर आपण काय करणार ? कुणी काही विक्षिप्तपणा केला, चित्रविचित्र शब्द वापरले, तर काय करायचे, तेच कळत नाही. आज मला या सरस्वतीमंदिरात यायची संधी मिळाली. त्याबद्दल मी आभारी आहे आणि श्रीपुंच्या शतकपूर्तीलाही मी हजर असेन व अध्यक्षपदापेक्षा अधिक वरच्या पदावर असेन, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

श्रीपुंची ओळख कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी करून दिली. रवींद्र पिंगेलिखित मानपत्राचे वाचन मृणाल देव यांनी केले. ज्येष्ठ पत्रकार अरुण टिकेकर यांनी निवड समितीतर्फे



मनोगत प्रकट केले. रंगसंमेलनाध्यक्ष ज्येष्ठ नाट्यकर्मी विजया मेहता यांनीही सृजनशीलतेबद्दल विचार मांडले.

## कोंकणीत स्त्रीवादी लेखिकेस साहित्य अकादमी पुरस्कार

यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार लाभलेल्या स्त्रीवादी लेखिका हेमा नायक यांनी १९७० पासून सतत गोव्यातील स्त्रियांचे प्रश्न मांडलेच नाहीत, तर प्रकाशिका म्हणून स्त्रियांना लिहिते करण्यासाठी चळवळ केली, शिबिरे घेऊन नवलेखिकांचे साहित्य प्रकाशित केले.

त्यांचे पती पुंडलिक नायक हे कोंकणातील आघाडीचे लेखक असून एका घरात दोन पुरस्कार प्राप्त करणारे हे बहुधा भारतातील पहिले दाम्पत्य असेल.

हेमा नायक यांची पुरस्कार प्राप्त 'भोगदंड' ही कादंबरी स्त्रियांचा लैंगिक हक्काचा क्रांतिकारी पुरस्कार करते.

## नाथ पै एकांकिका स्पर्धेत पुण्याची 'आसक्त' प्रथम

कणकवली येथील वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे आयोजित रौप्यमहोत्सवी नाथ पै एकांकिका स्पर्धेत खुल्या गटात पुण्याच्या आसक्तच्या ''पांढऱ्या घोड्यावरचा राजपुत्र' एकांकिकेने प्रथम क्रमांक मिळविला. या एकांकिकेचे दिग्दर्शक सागर देशमुख आणि अभिनयासाठी अमेय साने यांना प्रथम पारितोषिक मिळाले.

शालेय आणि खुल्या गटातील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण झाले. परीक्षक डॉ. पुष्पा राजापुरे, प्रेमानंद गज्वी आणि गिरीश पतके यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.

निकाल : खुला गट : सांघिक : प्रथम - पांढऱ्या घोड्यावरचा राजपुत्र (आसक्त पुणे), द्वितीय - चित्रकथी (सिंधुदुर्ग सांस्कृतिक किनारा, देवगड), तृतीय - वासांसि जिर्णानि (जवळीक, सोलापूर), चतुर्थ - दशावतार गोविंद हरिश्चंद्राचे (उत्कर्ष सेवा मंडळ, मुंबई).

वैयक्तिक पारितोषिके : दिग्दर्शक - प्रथम - सागर देशमुख (पांढऱ्या घोड्यावरचा राजपुत्र, आसक्त, पुणे), द्वितीय - संजय धुरी (चित्रकथी, सिंधुदुर्ग सांस्कृतिक किनारा, देवगड) आणि तृतीय - शशिकांत लावणीस (वासांसि जिर्णानी, जवळीक सोलापूर). तांत्रिक अंगे : प्रथम - चित्रकथी (सिंधुदुर्ग सांस्कृतिक किनारा, देवगड), द्वितीय - पांढऱ्या घोड्यावरचा राजपुत्र (आसक्त, पुणे), तृतीय - दशावतार गोविंद हरिश्चंद्राचे, (उत्कर्ष सेवा मंडळ, मुंबई)

## बाबूराव काटे यांना पठ्ठे बापूराव पुरस्कार प्रदान

वयाच्या ९१व्या वर्षांही आपल्या कवनांद्वारे देशभक्ती व एकात्मतेचा संदेश देणारे लोकनाट्य कलावंत बाबूराव काटे भिलवडीकर यांना यंदाचा पठ्ठे बापूराव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे हे पाचवे वर्ष आहे.

पठ्ठे बापूराव यांच्या स्मृतिदिनानिमित्त पठ्ठे बापूराव प्रतिष्ठान व सांस्कृतिक कला मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या लावणी महोत्सवात खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. अकरा हजार रुपये व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सत्काराला उत्तर देताना श्री. कांटे म्हणाले, ''तमाशासारख्या लोककलेला उच्चवर्णीयांपर्यंत पोचवणारे पठ्ठे बापूराव यांच्या नावाने आमच्यासारख्या जुन्या कलावंतांचा सन्मान होत आहे, याचा मला अभिमान वाटतो.

पठ्ठे बापूरावांच्या नावाने स्मारक उभारण्याचा मानस खासदार पाटील यांनी व्यक्त केला. नवोदित कलाकारांसाठीचा बापूसाहेब जिंतीकर पुरस्कार - दीनानाथ साठे, प्रवीण सूर्यवंशी, माधवी गवंडे व पल्लवी जाधव यांना प्रधान करण्यात आला.

प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष जयप्रकाश वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्ष तात्यासाहेब नकाते यांनी आभार मानले.

# स्पर्धा निकाल- नोव्हेंबर २००२

## मुखपृष्ठ ओळखा

**१. देवदास - शरच्चंद चट्टोपाध्याय**

**२. निरामय यशासाठी - शुभदा गोगटे**

**३. व्हॉट वेंट रॉंग - किरण बेदी**

**४. संवादिनी - व. पु. काळे**

**५. त्रिवेणी - गुलजार**

**६. एकवचनी - संजय राऊत**

### विजेते

**संजय देवगोंडा पाटील**
चिंचवाड हायस्कूल,
चिंचवाड ता. करवीर
जि. कोल्हापूर - १९

**उर्मिला इनामदार**
३/१६, उषा स्वप्न सोसायटी
सात बंगला, अंधेरी (प)
मुंबई ४०० ०६१
सभासद क्र - आय - ८५

**जिन्नाप्पा बाळू वसवाडे**
मु. पो. शिरढोण
ता. शिरोळे
जि. कोल्हापूर

## विजेत्या स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन

आपण आपल्या पसंतीची १००रु. किंमतीची पुस्तके कळवावीत.
आमचा पत्ता - मेहता मराठी ग्रंथ जगत, १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०


**आमच्या योजनांचे आजच सभासद व्हा**
**आणि २५% सवलत मिळवा!**

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**मेहता पब्लिशिंग हाऊस ,१२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०**




## संमेलने

**साहित्यकलांचे क्षेत्र हे अत्यंत बेभरवशाचे आणि अनिश्चिततेचे.**

# नवलेखकांना ग्रंथव्यवहाराचे व्यापक भान हवे.

**सदाशिवनगर येथे २५/२६ डिसेंबर रोजी तिसावे अंकुर साहित्य संमेलन झाले. त्याच्या अध्यक्षपदावरून सुप्रसिद्ध समीक्षक शंकर सारडा यांनी नवलेखकांचे व्यापक ग्रंथव्यवहाराकडे लक्ष वेधले. त्या भाषणातील काही भाग येथे देत आहोत.**

साहित्यप्रेमी बंधूभगिनींनो

आपण सर्वजण साहित्यावर प्रेम करणारे आहात. रसिक, वाचक, आस्वादक आहात. लेखन-काव्य लेखनात रस घेणारे आहात. लिहिण्याची हौस आपणाला असते. आपले नाव छापून आलेले पाहण्यात एक थ्रील असते. आपल्याला कवी लेखक म्हणून ओळखले जावे याची ओढ असते. त्यात एक प्रकारचे ग्लॅमर वाटते. एक नवी अस्मिता, ओळख हवीहवीशी वाटत असते.

परंतु साहित्यकलांचे क्षेत्र हे अत्यंत बेभरवशाचे, अनिश्चिततेचे असते. त्या क्षेत्रातील यश-अपयशाची गणिते वेगळी असतात. शंभर लोक लिहितात. पण त्यातील एखादाच गाजतो. वर्षानुवर्षे लिहूनही एखाद्याला मानमान्यता मिळत नाही. पण काही भाग्यवान असे असतात की पहिल्याच किंवा एखाद दुसऱ्या पुस्तकानेच एकदम प्रसिद्धीच्या झोतात मिरवू लागतात. बक्षीस-पुरस्कारांची त्यांच्यावर खैरात होते. देश-परदेशातून त्यांना आमंत्रणे येतात. सरकारी दरबारी त्यांची वाहवा होते. वेगवेगळ्या कमिट्यांवर त्यांची वर्णी लागते. क्वचित प्रसंगी आमदारकीची झुलही अंगावर चढते. उपरा, उचल्या, बलुतं, कोल्हाट्याचा पोर, पानिपत, झाडाझडती यासारखी पुस्तके आणि लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, दया पवार, किशोर शांताबाई काळे, विश्वास पाटील, वगैरे नावे आठवून बघा. एखादे पुस्तक क्लिक होणे म्हणजे काय हे त्यावरून लक्षात येईल. असे एखादे पुस्तक क्लिक झाले की त्या लेखकाला एखाद्या हीरोसारखे महत्त्व प्राप्त होते. आणि हां हां म्हणता त्याचे सगळीकडे नाव होते. अशा लेखकाला मानसन्मान मिळतात. पैसा मिळतो. त्याच्या पुढच्या पुस्तकांनाही भरपूर भाव मिळतो. प्रकाशक, चित्रपट निर्माते, सीरियलवाले यांच्या दारी खेटे घालतात. पण असले भाग्य फार थोड्या लेखककवींना लाभते. बाकीचे शेकडो कविलेखक वर्षानुवर्षे लिहित राहतात; ते कुठेतरी दैनिकात, रविवार पुरवणीत, मासिकात किंवा पुस्तक रूपात प्रसिद्ध होत राहते; पण त्याची फारशी दखल कुणीच घेत नाही. समीक्षक त्याची कदर करीत नाहीत. वाचक त्यांची पुस्तके घेत नाहीत. पैसा मिळत नाही. कीर्ती नाही. आपल्या लहानशा वर्तुळात आपल्याला कुणीतरी ओळखते एवढेच काय ते समाधान. कुठे कविसंमेलनाचे आमंत्रण आले, एखादी कविता वाचायला मिळाली, आपले घोडे गंगेत न्हाले, म्हणून आपण खूष.

मित्रहो ! आपल्यापैकी अनेकजण लेखक-कवी आहेत. आपण काही ना काही लिहित असतो, परंतु ज्या यशाची स्वप्ने आपण बघत असतो. ते आपल्या वाट्याला सहसा कधी येतच

नाही. ते सारखी आपल्याला हुलकावणीच देत राहते. त्यामुळे कधी कधी नैराश्य येते, कधी उद्वेग, खंत वाटत राहते. परंतु तरीही कुठेतरी आपल्याला समानधर्मा भेटेल, आपली किंमत जाणणारा रत्नपारखी भेटेल, आपण करतो आहोत ते महत्त्वाचे आहे, आपण लिहित राहायला हवे, आपल्याला जे जाणवते ते मांडत राहायला हवे असे आपल्याला आतून जाणवत असते. त्यामुळे घेतला वसा आपण सोडत नाही. एक वाचक, रसिक म्हणून, संपादक-प्रकाशक-ग्रंथपाल, शिक्षक, संघटक, पत्रकार, रंगकर्मी, कथाकथनकार, काव्यवाचक, पालक, कलावंत, प्रचारक, वक्ता, विचारवंत अभ्यासक, संशोधक कुठल्यातरी नात्याने आपण पुस्तकांच्या जगाशी आपली जवळीक टिकवून धरत असतो.

लेखक, कवी म्हणून आपली प्रतिमा निर्माण करणे हा एक स्वतंत्र प्रांत आहे. स्वतंत्र विषय आहे. पण ग्रंथव्यवहाराशी आणि कलासाहित्यक्षेत्राशी निगडित व्यक्ती म्हणून आपली प्रतिमा जपणे ही गोष्ट त्यामानाने सर्वांना शक्य आणि सुलभ आहे. अशी रसिकांची भूमिकाही उत्तम पार पाडणारे लोक हे खरे तर साहित्य कलाक्षेत्राचे मुख्य आधारस्तंभ होत. त्यांच्यामुळे ग्रंथव्यवहार चालू राहतो, गजबजलेला राहतो. साहित्य हे केवळ लेखकाचे किंवा लेखकांसाठी नसते. ते वाचकांसाठी असते, वाचकांचे असते. एक वाचक म्हणून स्वत:बद्दल अभिमान बाळगा. त्यातील मोठेपणा ओळखा.

एक लेखक म्हणून आपण स्वत:कडे पाहतो तेव्हा आपल्याला काय वाटते ? आपल्याला काय वाटायला हवे ?आपण लिहितो म्हणजे नेमके काय करतो ?

काव्य असो, कथा असो, कादंबरी असो, आपण लिहित असतो ते आपल्या अनुभवाबद्दल लिहित असतो. हे अनुभव आपल्या स्वत:चे, स्वत:च्या जीवनातील असतील. आपल्या अवतीभवतीच्या लोकांच्या जीवनातील असतील. न्यायअन्यायाचे, सुखदु:खाचे, हर्ष-खेदाचे, दैन्य-दारिद्र्याचे, यशापयशाचे, क्रौर्य-हिंसेचे, कल्पनेतले, स्वप्नातले, मनोविश्वातले कुठलेही असू शकतील.

आता प्रश्न असा की हे अनुभव आपले आहेत. आपल्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहेत. परंतु ते जेव्हा मी लिहितो तेव्हा ते केवळ माझे राहत नाहीत. ते केवळ स्वान्त:सुखाय राहत नाहीत. ते जो जो कोणी वाचेल त्याचे होऊ पाहतात. त्या वाचकाला ते अनुभव महत्त्वाचे वाटतात का ? आपल्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले अनुभव इतर व्यक्तींना आणि वाचकांनाही तेवढेच किंवा तितकेच महत्त्वाचे व उत्कट वाटतात का ? तसे जर नसतील तर त्याला ते वाचावेसे वाटतील का ? आपल्या अनुभवांशी त्याची काही नाळ जुळते का ? त्याला त्या अनुभवात काही वेगळेपणा वाटतो का ? त्या अनुभवात गुंतण्यासारखे, शिकण्यासारखे, दिलासा देण्यासारखे, त्याला काही सापडते का ? ते अनुभव वाचताना इतरांना मानवी जीवनाबद्दल काही नवे ज्ञान, नवे भान, नवी अंतर्दृष्टी, नवे परिप्रेक्ष्य (पर्सेप्शन) लाभणार आहे का ? वाचकाला धक्का बसेल, त्याला अस्वस्थ करील, त्याला त्याच्या आत्ममग्न कोशातून बाहेर काढील, समाजाचे नवे काही रूप वा वास्तव दाखवील असे काही तुमच्या अनुभवात किंवा तुमच्या अनुभव मांडण्याच्या पद्धतीत, तुमच्या लेखनशैलीत, भाषाशैलीत, विचारपद्धतीत, आविष्कारपद्धतीत आहे का ? तसे काही असेल तर ते इतरांना, वाचकांना, रसिकांना वाचावेसे वाटेल असे मानायचे का ?

पुस्तक वाचणे ही काही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी आधी वाचता यायला हवे. पुस्तक मिळविता यायला हवे. (मग ते फुकट असो वा विकत असो); आणि ते वाचण्यासाठी वेळ हव पुस्तक वाचायला घेतले, दोन-चार पाने वाचल्यावरच ते कंटाळवाणे वाटले तर वाचक ते वाचत राहील का ? नाही. एकेक शब्द, एकेक वाक्य, एकेक परिच्छेद, एकेक पान, एकेक प्रकरण...



त्या प्रत्येकातून काहीतरी आपल्या डोक्यात शिरावे लागते. आपल्या भावविश्वात शिरावे लागते. शब्दांचे अर्थ, अन्वयार्थ, वाच्यार्थ, ध्वन्यर्थ, सांकेतिक अर्थ, संदर्भ सर्व काही आकळावे लागते. तेव्हा ते खरे वाचन होते. ते आपल्याला मग खरे झपाटून टाकते.

बरे, हा असा शेवटपर्यंत वाचून पुस्तकाचा आस्वाद घेणारा वाचक केवळ आपली भाषाच जाणणारा म्हणजे मराठीच हवा का ? तसेही नाही. पुस्तकाचा अनुवाद झाला तर इतर भारतीय भाषकांना किंवा इंग्लंड-अमेरिकेतल्या वा फ्रेंच-चिनी-जपानी माणसांनाही तो वाचावासा वाटेल, असे का मानू नये?

हा जागतिकीकरणाचा जमाना आहे. साहित्य हा सर्वात जास्त विश्वात्मक आवाहन असणारा प्रकार मानवी संस्कृतीच्या आरंभापासूनच आहे. तेव्हा आपलेही साहित्य हे विश्वसाहित्याचा भाग आहे आणि भारतीयांप्रमाणे परदेशातील लोकही ते वाचण्यासाठी उत्सुक असतील असे आपण का मानू नये?तशा मोठ्या वाचकवर्गासाठी आपण व्यापक परिप्रेक्ष्यात का मांडू नयेत ?

आजही आपण अशा जागतिक पातळीवरच्या लेखकांनी झपाटून जातच असतो. त्या त्या लेखकाचे नाव घेतले की, अनुभवविश्वाचे एकेक आगळेवेगळे दालन आपल्यापुढे उभे राहते. एकेक लेखक म्हणजे एकेक स्वतंत्र भावविश्व समोर येते. मारिओ पुझोच्या गॉडफादरचे नाव घ्या, इटालीतील व अमेरिकेतील माफिया टोळ्यांचे जग डोळ्यासमोर उभे राहते. टॉलस्टॉयच्या वॉर अ‍ॅन्ड पीसचे नाव घ्या. रशियावर नेपोलियनने केलेली स्वारी आणि तिच्यात त्याचा झालेला पराभव, हा सगळा इतिहासाचा भव्य पट नजरेपुढे तरळून जातो. अर्नेस्ट हेमिंग्वेच्या 'दि ओल्ड मॅन अँड दि सी'चे नाव आठवा. अफाट समुद्रात अतिप्रचंड शार्क माशाशी एकाकी झुंज देणाऱ्या आणि 'मॅन कॅन बी डिस्ट्रॉइड् बट नॉट डिफिटेड' असा जाज्वल्य संदेश देणाऱ्या वृद्ध कोळ्याचे जग समोर येते. हॅरी पॉटर हे नाव घेतले की, जादूच्या शाळेच चित्र समोर येते. अशी आपल्याकडचीही शेकडो उदाहरणे देता येतील.

आपले अनुभवविश्व वेगळे असेल तर वाचकांचे लक्ष त्याच्याकडे जातेच. एकेक लेखक म्हणजे एकेक भावविश्व. ते देशांच्या सीमा पार करते. भाषांच्या सीमा पार करते. अशी कृती आपल्या हातून निर्माण व्हावी, ती क्लासिक ठरावी. मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक ठरावी. अजरामर होण्यासाठी कधी कधी एखादे वाक्यही पुरते. एखादी कविताही पुरते. एखादी कथा-कादंबरीही पुरेशी ठरते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि तो मी मिळविणारच' या एका वाक्याने लोकमान्य टिळक अजरामर झाले. 'रोबो' या शब्दाचा उच्चार करताना कॅरेल चॅपेक हा झेक लेखक आठवणारच. हॅम्लेट, रोमिओ अँड जुलिएट, किंग लियर, शायलॉक यासारख्या व्यक्तिरेखा निर्माण करणारा शेक्सपियर अजरामर राहणारच ! संज्ञाप्रवाहाचा वापर करून एका दिवसातल्या एका व्यक्तीच्या आयुष्यातले विचारभाव टिपणारी युलिसिस ही कादंबरी जेम्स जॉइसला गेल्या शतकातला सर्वश्रेष्ठ कादंबरीकार हा सन्मान देऊन गेली. मार्क्सने 'दास कॅपिटल' हा ग्रंथ लिहून जगातील अनेक देशांमधले समाजजीवन ढवळून काढले. सीमाँ द बोव्हाने 'दि सेकंड सेक्स' लिहून स्त्रीत्व हे निसर्ग निर्मित नव्हे तर ते एक समाज-घटित आहे असे सांगून स्त्रीवादी विचाराचा पाया घातला. अंकल टॉम्स केबिनने निग्रो समाजाकडे पाहण्याची अमेरिकनांची दृष्टीच आमूलाग्र बदलणे भाग पाडले. 'रूटस्' या आत्मकथनाने अमेरिकेत आपल्या पूर्वजांचा व वंशावळीचा शोध घेण्याची लाट उसळली.

पुस्तके जगाला नवी दिशा दाखवतात. व्यक्तीच्या आयुष्यात बदल घडवून आणतात. समाज संघटित-विघटित करतात. सत्तास्थाने उलथून टाकतात. क्रांत्या घडवून आणतात. आपल्या अनुभवांचे

वेगळेपण आपण नेमके जाणले आणि नेमकेपणाने मांडले तर सगळ्या जगभर आपल्याला आपले चहाते, श्रोते, वाचक मिळू शकतात.

आपले लेखन बरे आहे की वाईट, टिकाऊ की तात्कालिक हा विचार करत काथ्याकूट करायची गरज नाही. काळाच्या कसोटीवर आपले साहित्य उतरते की नाही हे आता, या क्षणी, निर्मितीच्या आवेगात नाही सांगता येणार. आपल्या कलेला तात्कलिक यशाचीही गरज असते. समकालीनांची दादही आवश्यक असते. तुम्ही नाटक लिहिले. पहिल्या प्रयोगातच पडले; तर पुढे काय ? प्रेक्षकच नसले तर नाटक करणार कसे ? आपल्या साहित्याचे महत्त्व सिद्ध व्हावे लागते ते आधी समकालीन वाचकवर्गाकडून. समकालीनांचे कौतुक, प्रशंसा, प्रतिसाद आपल्याला नवा जोम देणारा ठरतो. आर्थिक यश पुढच्या वाटचालीला प्रेरक ठरते. समाजाची श्रीमंती, समाजाच्या ज्ञानविषयक गरजांची व्यापकता यांचा आणि आपल्या सांस्कृतिक, साहित्यिक कर्तृत्त्वाचा मोठा घनिष्ठ संबंध असतो. समकालीनांच्या शाबासकीची, प्रशंसेची महती मोठी विलक्षण असते. ती वेळीच मिळाली तर लेखक-कवींना भराऱ्या घेण्याची इच्छा होते. महत्त्वाकांक्षा प्रज्वलित होते. परिश्रम घेण्याची गरज वाटते. एरव्ही हे 'अंकुर' कलिकावस्थेतच कोमेजून, करपून जातात. अर्थात लेखक म्हणून आपली मूळची प्रतिभा-प्रज्ञा कितपत चिवट आहे यावरही हे अवलंबून राहते. केवळ टाळ्यांनी कुणी कलावंत मोठा होत नाही. टाळ्या मिळवण्याएवढे कौशल्य अंगी असावेच लागते.

लेखक, कवी होण्यासाठी आपल्याजवळ अनुभव-आशयद्रव्य असेल तरी त्याचा वापर समर्थपणे करण्याचा मार्ग आपल्याला सापडतोच असे नाही. आरंभीचे बरेचसे लेखन अनुकरणात्मक असते. आपली आवडती काव्ये, कथा किंवा लेखक यांच्याच पडसादाचे रूप त्यात प्रभावी असते. आपल्या स्वत:च्या अनुभव क्षेत्राचे वेगळेपण आणि आपण निवडलेला अभिव्यक्तीचा प्रकार त्याचे नाते नेमके जुळतेच असे नाही. आपली मानसिक, सांस्कृतिक जडण-घडण व प्रकृती आणि आपण निवडलेला वाङ्मयप्रकार यांचा मेळ बसतोच असे नाही. आपल्याला दीर्घ लेखनाची आवड आहे की अल्पाक्षरमणीयत्वाची, आपली ताकद किती दूरचा पल्ला गाठू शकते यांची नेमकी कल्पना असेल तर आपली क्षमता योग्य रीतीने वापरता येऊ शकते.

कवितेत आपल्याला स्वारस्य असेल तर आपण हायकू, ओवी, गझल, वात्रटिका, अभंग, चारोळी, आरती, सुनीत, विडंबन काव्य, लावणी, भावगीत, पोवाडा, स्फूर्तिगीत, बडबडगीत, मंगलाष्टक, कथाकाव्य पासून खंडकाव्य आणि महाकाव्य यापैकी कोणताही प्रकार हाताळू शकतो. आपली ताकद चार ओळीचे काव्य लिहिण्याची आहे की दहा हजार ओळींचे महाकाव्य, हे आपणच जाणून घ्यायचे असते.

कथात्मक प्रतिभा आपल्यात असेल तर दहावीस ओळींची लघुत्तमकथा, पाच दहा ओळींचा विनोद, किस्सा, हास्यकिस्सा, व्यंगकथा, दृष्टांत कथा, रूपककथा, लघुकथा, दीर्घकथा, कादंबरिका, कादंबरी, महाकादंबरी, अनेक खंडांची कादंबरी अशा क्षेत्रात आपण संचार करू शकता. उत्तम लघुत्तमकथा किंवा दृष्टांतकथा लिहिणाऱ्यांनाही एखाद्या कादंबरीकाराएवढीच प्रसिद्धी मिळू शकते. विनोदी चुटका लिहूनही जगभर नाव होऊ शकते.

नाट्यात्मक लेखनाचे अंग आपल्यात असेल तर नाट्यछटा, नाटुकले, स्वगत, एकांकिका, संवाद, प्रहसन, सुखात्मिका, शोकांत्मिका, पटकथा, श्रुतिका, सीरियल लेखन असे अनेक प्रकार आपण हाताळू शकता. प्रत्येक 'नाट्य'कार हा शेक्सपियरसारखा नाटके लिहिणाराच हवा असे नाही. नाट्यछटा लिहिणारे दिवाकरही मराठी साहित्यात अजरामर आहेत !

आपण कुठलाही एक वा अधिक लेखनप्रकार निवडून त्यात आपले सर्वस्व ओतू शकता.



लोक साध्या विनोदालाही दाद देतात आणि नटसम्राटलाही दाद देतात.

हे वेगवेगळे वाङ्मय प्रकार वेगवेगळ्या प्रकारच्या कौशल्याची, क्षमतेची, प्रतिभेची, ताकदीची अपेक्षा ठेवतात. काही रचना आशयाच्या अंगाने जातात, काही शाब्दिक क्षमतेवर आधारित असतात. आर्किटेक्ट ज्याप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारच्या इमारती बांधतो, त्या प्रत्येक वास्तुप्रकाराप्रमाणे वापरायचे साहित्य निवडतो-त्याप्रमाणे लेखकालाही आपण निवडलेल्या शब्दवास्तूचा प्रकार आणि त्यासाठी लागणारा कच्चा माल याचे भान ठेवावे लागते. आपल्याला शेतावर झोपडी बांधायची असेल तर गवत, बांबू, वासे वगैरे साहित्य लागेल. दोन खाल्यांचे घर, बंगला, चाळ, अनेक मजली इमारत, अपार्टमेंट, राजवाडा, शाळा, कॉलेज, डिपार्टमेंटल स्टोअर, भुईकोट किल्ला, डोंगरावरचा किल्ला, सागरी किल्ला, संसद भवन, मल्टी नॅशनल कंपनीचे कार्यालय, काय बांधायचे आहे ते ठरवावे लागते आणि त्याप्रमाणे त्यासाठी लागणारे साहित्य, त्याची रचना, यांचे तपशील ठरवावे लागतात. वेगवेगळ्या साहित्य प्रकारांच्याही गरजा वेगवेगळ्या असतात; आणि आपल्याला त्यापैकी ज्या उपलब्ध आहेत त्यांचा चपखल आणि कार्यक्षमपणे वापर करून आपण आपली इमारत उभी करायची असते. बांधायचा; राजवाडा तर मग केवळ गवत-बाबूंसारखे झोपडीचे साहित्य जवळ असून कसे भागणार ?

आपण लेखक आहो याचा नेमका अर्थ काय ? हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

विशिष्ट अनुभव विशिष्ट आकृतिबंधात, विशिष्ट भाषेत, विशिष्ट शैलीत मांडणारे आपण कलावंत आहोत. केवळ शाळेत अक्षरओळख झाली म्हणून आपणास लिहिता येते, या अर्थाने आपण लेखक बनतो असे नाही. कारकूनही नोंदी करतो पण त्याला आपण लेखक म्हणत नाही. लेखक भाषेचा वापर अनुभव कथनासाठी, भावभावनांच्या आविष्कारासाठी विशिष्ट क्षमतेने करतो.

त्याचबरोबर केवळ अनुभव गाठीशी आहे म्हणून आपण लेखक ठरतो असे नाही. जन्मलेल्या प्रत्येकालाच अनुभवांच्या भल्याबुऱ्या चक्रातून जावे लागते. म्हणून तो लेखक होतो असे नाही. लेखकाला आपल्या अनुभवांकडे पाहण्याची, ते अनुभव मांडण्याची विशिष्ट दृष्टी असावी लागते. पॉईंट ऑफ व्ह्यू असावा लागतो. जीवनविषयक तत्त्वज्ञानाची बैठक असावी लागते. केवळ आहे तसे दृश्य मी रंगवतो- असे म्हणणे ही स्वत:ची व इतरांची दिशाभूल करणारे असते. कुठलेही दृश्य बघताना, रंगवताना आपण विशिष्ट दृष्टिकोनातून, मनोवस्थेतून बघत असतो. आपले मूल्यभान त्यावेळी कार्यप्रवण असते. मी मार्क्सवादी असेन तर समाजातील घटकांकडे वर्ग विग्रह, वर्ग संघर्ष या भूमिकेतून पाहून तसे चित्र रंगवीन. गरीबांचे, कामगारांचे शोषण करणाऱ्या श्रीमंतावर मी टीका करीन. मी हिंदुत्ववादी असेल तर मुंबई-गुजरातमधल्या दंगलीचे विश्लेषण ज्या प्रकारे करीन, त्या प्रकारे मुस्लिम मूलतत्त्ववादी करतीलच असे नाही. गलिव्हर्स ट्रॅव्हल्सप्रमाणे बुटक्यांच्या देशात आपण उंच ठरतो, तर उंच लोकांच्या देशात आपण बुटके ठरतो. त्यानुसार आपल्या पाहण्यात आणि मूल्यमापनात फरक पडतो. पुरुष-स्त्री, कामगार-मालक, बाल-प्रौढ, विद्यार्थी-शिक्षक, कारकून-बॉस यासारख्या नात्यातही द्वंद्व असते; आणि कुठल्याही घटनेकडे पाहण्याची प्रत्येकाची वृत्ती वेगळी ठरते. सकारात्मक, नकारात्मक दृष्टीनेही आकलनात फरक पडतो. मांडणीत फरक पडतो. या द्वंद्वांकडे आपण कसे पाहतो ? स्त्रीवादी साहित्य, दलित साहित्य, सबलटर्न साहित्य, वसाहतवादी साहित्य हे शब्द आपण वापरतो तेव्हा विशिष्ट भूमिकेतून होणारे जीवनाभुवनाचे चित्रण आपण गृहीत धरत असतो. वास्तववादी, अतिवास्तववादी, रोमँटिक, क्लासिकल,अस्तित्ववादी, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, मनोविश्लेषणात्मक विरचनावादी, रूपवादी, ब्राम्हणी, अब्राम्हणी वगैरे दृष्टिकोन आपल्या अनुभवांना त्यांचे असे एक खास रूप देतात. तुमच्या जीवनविषयक

दृष्टिकोनानुसार तुमच्या अनुभवांची मांडणी होत जाते आणि त्यातील उत्कटता, तीव्रता, गांभीर्य आणि गुणवत्ता यांची गणिते बदलत जातात.

आपल्या अनुभवाची आणि विशिष्ट दृष्टिकोनाची सांगड एवढीच सामग्री पुरेशी नाही. ही सामग्री व्यक्त करण्याचे आपले माध्यम (मिडियम) ही गोष्टही महत्त्वाची आहे. त्यासाठी भाषाशैली हवी, शब्दसंपत्ती हवी. भाषेचा संवेदनाक्षम वापर करण्याची क्षमता हवी. ग्रामीण कादंबरीतील जीवन रंगवताना तेथील व्यक्तींचे संवाद-संभाषण यासाठी जी भाषा योग्य ठरेल ती मुंबईसारख्या महानगरीतील उच्च व मध्यमवर्गीयांची कहाणी सांगताना योग्य ठरणार नाही. पुण्याची भाषा, वऱ्हाडची भाषा, मराठी मुसलमानांची भाषा, बेळगावच्या लोकांची मराठी भाषा... प्रत्येक फरक महत्त्वाचा आहे; आणि आपण जी पार्श्वभूमी निवडतो, तिच्याशी भाषेचा अतूट संबंध असतो. भाषांतरात अशा भाषिक वैशिष्ट्यांचा वेगळ्या पातळीवरून विचार करावा लागतो. पण तो स्वतंत्र विषय आहे. आपण दाखवू पाहत असलेले समाजचित्र आणि त्याची भाषा यांचे नाते विसरून चालत नाही, एवढेच येथे मला सांगायचे आहे. तपशीलात जाण्यास येथे अवसर नाही.

हे सगळे करूनही, मेहनत घेऊनही लेखक म्हणून जगताना अनुभूतीचा काही भाग हा आपल्या हाती लागतच नाही, हेही मुद्दाम सांगावेसे वाटते.

कुठलीही लेखन कलाकृती हा एक अपघात असतो. विशीच्या आतला ज्ञानेश्वर ज्ञानदेवी-ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक ग्रंथ लिहून जातो. त्यावेळी मराठी भाषा प्राथमिक अवस्थेत असेल, पण ते प्राथमिकपण ज्ञानेश्वरांच्या मार्गात धोंड बनून राहिले नाही. साने गुरुजींनी तुरुंगात असताना चार दिवसांत श्यामची आई हे हस्तलिखित पूर्ण केले. मित्राच्या मुलांना गोष्ट सांगायची म्हणून लुईस कॅरोलने 'ॲलिस इन वंडरलँड' ही अदभूत कहाणी रचली. ज्यूल व्हर्नच्या डोक्यात १८६३ साली चंद्रावर स्वारी करण्यासाठी अग्निबाण वापरण्याची कल्पना येते आणि ती कादंबरीद्वारे तो मांडतो. प्रत्यक्षात जेव्हा १९६५ मध्ये चंद्रावर यान जाते तेव्हा त्याचे, त्या कादंबरीत दिलेल्या त्या अग्निबाणाची लांबी, रुंदी व रचना याबाबत बरेच साम्य असते. अशी अनेक उदाहरणे देता येतील. कलाकृतीचा जन्म हा एक अपघात असल्याचे त्यातून जाणवते. परंतु त्याचबरोबर एकच लेखक एकापाठोपाठ एक अशा चांगल्या कादंबऱ्या देतो तेव्हा या निर्मितीमागे अपघात नसून एक योजनाही असते हेही मान्य करावे लागेल. एक नवोदित लेखक म्हणून आपण हा अपघातापेक्षा नियोजनबद्ध अभ्यास-परिश्रमाचा मार्ग चोखाळणे हेच जास्त श्रेयस्कर. हे सांगायला नकोच !

ललित लेखन हा व्यवसाय किंवा करियर करायला आपल्याकडे आजतरी वातावरण अनुकूल नाही. केवळ ललित लेखनावर निर्वाह करण्याएवढी कमाई परदेशात होऊ शकते. इंग्रजीत लिहिणाऱ्यांना होऊ शकते, पण मराठीसारख्या प्रादेशिक भाषेत लिहिणाऱ्यांना होऊ शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

पत्रकारिता, जहिरात एजन्सीत कॉपी रायटिंग, स्तंभलेखन, माहितीपूर्ण पुस्तकांचे लेखन-संकलन, अनुवाद, पटकथा, दूरचित्रवाणीचे मालिका लेखन, रहस्यकथा लेखन वगैरेंची जोड दिली तर लेखनावर निर्वाह होऊ शकतो. परंतु सृजनशील लेखनाला, कथा-काव्य-कादंबरी लेखनाला असे व्यावसायिक सातत्य लाभणे कठीण असते. त्याची निर्मिती प्रतिभेच्या लहरीवर व क्षमतेवर निर्भर असते. केवळ कष्टाने हे लेखन होत नाही. मेड टू ऑर्डर हा प्रकार येथे नेहमीच चालत नाही. प्रतिभेचा स्पर्श असेल तर अशा ललित लेखनाला महत्त्व येते. एरव्ही नाही.

ठीक आहे, तुम्ही तरीही लिहित राहिला, ते कुठेतरी वृत्तपत्रात, पुरवणीत, मासिकात छापून आले, त्याचे स्वखर्चाने वा कोणाच्या मेहेरबानीने पुस्तक निघाले; आनंद आहे. पण पुढे काय ?



ते पुस्तक आपल्याला हव्या असणाऱ्या वाचकवर्गापर्यंत जाते काय ? दहा कोटी लोकसंख्येच्या ह्या महाराष्ट्रात हजार-पाचशे प्रतींची आवृत्ती जरी वाटली गेली, तरी तिची टिमकी कुठवर वाजणार ? आणि दुर्दैव असे की, आपले पुस्तक बघणारे असे हजार पाचशे वाचकही भेटत नाहीत. मग गआपल्या लेखनाचा प्रभाव तो काय पडणार ? पुस्तक निघूनच भागत नाही ते खपायला हवे. हजारो वाचकापर्यंत जायला हवे. त्यांनी ते वाचायला हवे. ते आवडले असे कळवायला हवे. इतरांना सांगायला हवे, तर इतर लोक ते वाचण्यासाठी पुढे येणार, ते विकत घेणार, पुढची आवृत्ती निघणार, मग त्यापुढची. पण असे भाग्य किती पुस्तकांना लाभते ? एक होता कार्व्हरच्या वीस आवृत्त्या निघाल्या. लाखावर प्रती खपल्या. श्यामची आई - साठ वर्षात दोन लाख प्रती खपल्या... पण अशी पुस्तके विरळच ! जाहिरात केली. गाजावाजा झाला तर काही होणार. मराठी पुस्तकांना जाहिरात परवडत नाही. परीक्षणे येत नाहीत. पुस्तक निघालेय हेच लोकांना कळत नाही. तर मग पुस्तके वाचकापर्यंत जाणार कशी ? पुस्तके वाचकापर्यंत गेली तरच त्यांचे सार्थक. तरच अर्थप्राप्ती होणार. तरच प्रकाशक पुढचे पुस्तक काढणार.

पुस्तकांचा खप राहू द्या, त्याचे जाणकारांकडून कौतुक तरी व्हायला हवे ना ? पत्राद्वारे, अभिप्रायाद्वारे, पुरस्कार-मानसन्मानाद्वारे हे कौतुक होऊ शकते आणि तसे ते अपेक्षित असते. काही नामवंत लेखक नवोदितांना उत्तेजनपर दोन ओळींचे पत्र पाठवतात. पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज यांचा उल्लेख करायला हवा. पण आपल्या पुस्तकाचे नेमके मूल्यमापन, गुणदोष रसग्रहण हे कोणी समंजस भूमिकेतून करतातच असे नाही. त्यामुळे लेखकाला आपली उपेक्षा झाल्याचीच भावना जास्त जाणवते. निराशा वाटते.

हे आपल्यापैकी अनेकांचे दुखणे आहे. कौतुक नाही. खप नाही. फोटो नाही, मान्यता नाही, आमंत्रण नाही, वाङ्मयीन परंपरेत स्थान नाही. आपल्याला कोणी विचारत नाही.

हे दुखणे दूर कसे होणार ?

त्याची खंत कुठवर करीत राहणार ? अशी खंत करून भागणार नाही.

सकस निर्मिती, वैशिष्ट्यपूर्ण रचना, उत्कृष्ट निर्मिती, वाचकवर्ग मिळवण्याची ओढ, वाचक-समीक्षकांचा प्रतिसाद मिळवण्याचा प्रयत्न हे सर्व आपण कसे जमवून आणता यावर बरेच काही अवलंबून आहे.

त्यासाठी शॉर्ट कट नाही. हे सगळे सहजी मिळणार नाही. मी जांभई दिली तर, वा काय तान आहे म्हणून श्रोत्यांनी टाळ्या वाजवाव्या अशी अपेक्षा एखाद्या गायकाने ठेवावी का ? आपली रागदारीची आळवणी परिपूर्ण असली तरच दाद मिळणार. तशी ती मिळाली तरच आपल्या गायनाचे, रियाझाचे सार्थक ! नाही का ?

साहित्याचे हे सर्व क्षेत्र मोठे आकर्षक आहे. कमालीचा आनंद देणारे आहे आणि आपल्या जीवनाला अर्थ देणारेही आहे. पण हे क्षेत्र अत्यंत फसवेही आहे. मृगजळासारखे आहे. अनेकांना ते कायम हुलकावणी देत राहते. तरीही आपण सर्व साहित्यप्रेमाच्या सूत्राने एकत्र बांधले गेलेले आहोत. परस्पर मैत्र साधले तर बरेच काही साधू शकेल.

हे सर्व तुम्हांला जमो. तुमचे नाव होवो. तुमची लेखन क्षेत्रातील कामगिरी लक्षवेधक ठरो. असे मला वाटते.

साहित्यक्षेत्रात आपणा सर्वांना उज्ज्वल आनंद मिळो आणि 'अंकुर'च्या माध्यमातून नवलेखकांना नवप्रेरणा मिळो अशी आकांक्षा व्यक्त करून माझे हे अध्यक्षीय मनोगत मी पूर्ण करतो.

**शंकर सारडा**

# वाचनालयांना आवाहन

आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविधमार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.

परंतु मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुद्धीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.

यासाठी आज वाचनसंस्कृतीची वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयातून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत- अशी पुस्तके कित्येक वाचनलयांतून आज उपलब्ध होत नाहीत.

जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.


मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे पाईक बना, काही ज्येष्ठ नामवंतांनी नावाजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलेच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

कथासंग्रह

## पूर्णविरामानंतर



मानवी मनाच्या अनेक वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन घडविणाऱ्या या कथा. पूर्वीचा आदर्शवाद आणि आजचा वास्तव संघर्ष याचं दर्शन घडवणारा राही बर्वे यांच्या खास शैलीतील कथासंग्रह.

लेखिका : राही अनिल बर्वे
किंमत : ८०रु.

पॉप्युलर प्रकाशने प्रा. लि. मुंबई

## प्रारंभ

कादंबरी

मुंबईच्या वैभवशाली निर्मितीचे आद्य शिल्पकार असणारे जगन्नाथ तथा नाना शंकरशेट यांना केंद्रस्थानी ठेवून मुंबईच्या निर्मितीप्रक्रियेभोवती गुंफलेली कादंबरी


लेखक : गंगाधर गाडगीळ
किंमत : ७७५रु.




पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई

कादंबरी

## गौतमची गोष्ट




आजच्या व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनातील मूलभूत प्रश्नाचा शोध घेणाऱ्या नायकाची, आत्मपरावर्ती कादंबरी

लेखक : अनिल दामले
किंमत : १७५रु.


पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई

पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके


कवितासंग्रह

## आणि तरीही मी




वैयक्तिक जीवनानुभवाबरोबरच भोवतालच्या वास्तवाचा मनावर होणारा परिणाम अभिव्यक्त करणाऱ्या कवितांचा संग्रह.

कवी : सौमित्र
किंमत : २५० रु.

पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई

## शोभायात्रा

नाटक




राजकीय आणि तीव्र सामाजिक जाणीव यांचा सुरेख मेळ साधणारे नाटक.

लेखक : शफाअत खान
किंमत : ८०रु.

पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई

ललितलेखन

## संध्यामग्न पुरुषाची लक्षणे



काव्य निर्मिती प्रक्रियेचा एक आगळाच अनुभव साकारणारे, कविता, गद्य आणि चित्रीकरण या तिन्ही कलांचे एकत्र दर्शन घडविणारे ललितबंध.

लेखक : कवी ग्रेस
किंमत : ३००रु.

पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.मुंबई


पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.




# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके


आत्मचरित्र

## समिधा




बाबा आमटे यांच्या वादळी आयुष्याच्या प्रत्येक क्षणी त्यांना सतत सोबत करणाऱ्या साधनाताईंचे स्वतंत्र मते मांडणारे आत्मचरित्र.

लेखक : साधना आमटे
किंमत : २०० रु.

पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.मुंबई.

## खूप लोक आहेत

कादंबरी



रोजचे आयुष्य जगताना धर्माचे अस्तित्व नाकारणाऱ्या व्यक्ती व त्यांचे विचार गुंतागुंतीच्या कथानकातून मांडणारी, विचारांना नवी दिशा देणारी कादंबरी

लेखक : श्याम मनोहर
किंमत : १७५रु.

पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.मुंबई.

कला

## माधव सातवळेकर




रमेशचंद्र पाटकर यांनी घेतलेली ज्येष्ठ चित्रकार माधव सातवळेकर यांची सविस्तर मुलाखत; उण्यापुऱ्या पाच दशकांच्या चित्र - कारकिर्दीतील निवडक चित्रांचे प्रथमच पुस्तकरूपात सादरीकरण

लेखक : रमेशचंद्र पाटकर
किंमत : ३००रु.


ज्योत्स्ना प्रकाशन पुणे.

पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

माहितीपर

## सणांच्या गोष्टी





उत्सवप्रिय मराठी माणसाच्या पाडवा, गणपती, दसरा; तसेच पतेती, ईद व खिसमस अशा विविध सणांबरोबरच राष्ट्रीय सणांचीही सविस्तर माहिती रंजकपणे करून देणारे माधुरी भिडेलिखित पुस्तक.

लेखिका : माधुरी भिडे
**किंमत : ४०रु.**

ज्योत्स्ना प्रकाशन
पुणे.

कला

## वॉटरकलर




जलरंग हे माध्यम मुक्तपणे व आत्मविश्वासपूर्वक हाताळायला शिकवणाऱ्या या पुस्तकात मिलिंद मुळीक यांनी सराव, स्केचिंग, रचना, रंग, चित्रनिर्मिती अशा प्रकरणांतून जलरंगाची प्राथमिक तंत्रापासून सूक्ष्म बारकाव्यांपर्यंत तपशीलवार ओळख अनेक प्रात्यक्षिकांसह करून दिली आहे.


लेखक : मिलिंद मुळीक
**किंमत : २५०रु.**

ज्योत्स्ना प्रकाशन
पुणे.

निवडक वेचे

## वाचू आनंदे बाल गट- एक

वयोगट ९ ते ११




उत्तमोत्तम साहित्यातील अनेक उतारे, नामवंत चित्रकारांची चित्रे, विविध चित्र-शिल्पशैली या सर्वांचा परिचय मुलांना करून देण्याचा अभिनव प्रयोग
(राज्य विकास संस्था व ज्योत्स्ना प्रकाशन यांचा खास संयुक्त प्रकल्प)

संपादन : माधुरी पुरंदरे
नंदिता वागळे
**किंमत : ७५रु.**

ज्योत्स्ना प्रकाशन
पुणे.

पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.




# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

निवडक वेचे

## वाचू आनंदे कुमार गट- दोन

वयोगट १२ ते १५





उत्तमोत्तम साहित्यातील अनेक उतारे, नामवंत चित्रकारांची चित्रे, विविध चित्र-शिल्पशैली या सर्वांचा परिचय मुलांना करून देण्याचा अभिनव प्रयोग
(राज्य विकास संस्था व ज्योत्स्ना प्रकाशन यांचा खास संयुक्त प्रकल्प)

संपादन : माधुरी पुरंदरे
नंदिता वागळे
**किंमत : ७५रु.**

ज्योत्स्ना प्रकाशन
पुणे.

कथा

## सुलभ रामायण





ज्येष्ठ बालवाङ्मयकार राजा मंगळवेढेकर यांच्या रसाळ शैलीमध्ये प्रत्येक भारतवासीयाचा चिरंतन ठेवा. गोपाळ नांदुरकर यांच्या अप्रतिम चित्रांसह

लेखक : राजा मंगळवेढेकर
**किंमत : ५०रु.**

ज्योत्स्ना प्रकाशन
पुणे.

कथा

## सुलभ महाभारत




ज्येष्ठ बालवाङ्मयकार राजा मंगळवेढेकर यांच्या रसाळ शैलीमध्ये प्रत्येक भारतवासीयाचा चिरंतन ठेवा. गोपाळ नांदुरकर यांच्या अप्रतिम चित्रांसह.

लेखक : राजा मंगळवेढेकर
**किंमत : ५०रु.**

ज्योत्स्ना प्रकाशन
पुणे.


पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

मार्गदर्शनपर

## अक्षर कसे सुधारावे

ज्येष्ठ शिक्षक अ. म. भिडे यांच्या अनुभवसिद्ध सूचनांसह - प्रत्येक शिकत्या मुलाच्या हाती गेलेच पाहिजे असे हमखास अक्षर घडवणारे पुस्तक





लेखक : अ. म. भिडे
किंमत : ४०रु.

ज्योत्स्ना प्रकाशन
पुणे.

ललित

## आजी आजोबांची पत्रे




नामवंतांनी आपल्या नातवंडांना लिहिलेल्या ४०हून अधिक पत्रांचे मनोरंजक तसेच संस्कार करणारे संकलन


लेखिका : सुरेखा पाणंदीकर
किंमत : ७५रु.

ज्योत्स्ना प्रकाशन
पुणे.

चरित्रे

## आय डेअर : किरण बेदी

झुंजार व्यक्तित्वाची सुबोध ओळख




मूळ लेखक : परमेश डंगवाल
अनु. आशा कर्दळे
किंमत : २२५रु.

मेहता पब्लिशिंग
हाऊस, पुणे.


पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.



# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

कादंबरी

## चाणक्य




शतखंड भारताला एकसंध करणारा युगनिर्माता. आज पुन्हा अशा 'चाणक्य'ची भारताला गरज आहे.

लेखक : भा. द. खेर
किंमत : २५० रु.

मेहता
पब्लिशिंग
हाऊस, पुणे.

## टू कट् अ लाँग स्टोरी शॉर्ट

कथा

जेफ्री आर्चर यांच्या खास शैलीतील विस्मयकारक कथा.





मूळ लेखक : जेफ्री आर्चर
अनुवाद : लीना सोहोनी
किंमत : १८०रु.

मेहता
पब्लिशिंग
हाऊस, पुणे.

कादंबरी

## ज्युरॅसिक पार्क

चित्रपटापेक्षाही क्षणाक्षणाला थरारक अनुभव देणारी जबरदस्त कादंबरी.




मूळ लेखक : मायकेल क्रायटन
अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर

किंमत : २५०रु.

मेहता पब्लिशिंग
हाऊस, पुणे.


पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.

# नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके


**द्वंद्व**

कथासंग्रह

लोककथांच्या ढंगानं स्त्री-पुरुष नात्यातील विविध
पैलूंचं दर्शन घडवणाऱ्या कथा





**मूळ लेखक : विजयदान देथा**
**अनुवाद : वनिता सावंत**
**किंमत : १५०रु.**

मेहता पब्लिशिंग
हाऊस, पुणे.

कथासंग्रह

**रिवणावायली मुंगी**



आशय आणि विषयाचे वेगळेपण
सिद्ध करणाऱ्या कथा.


**लेखक : राजन गवस**
**किंमत : १३०रु.**

मेहता पब्लिशिंग
हाऊस, पुणे.

**नागरिक**

राजकीय

सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवणारे
नागरिक घडावे म्हणून आशेची धुनी पेटवून
केलेला सुसंवाद




**लेखक : अविनाश धर्माधिकारी**
**किंमत : १५०रु.**

मेहता पब्लिशिंग
हाऊस, पुणे.

पोस्ट खर्च प्रत्येकी २५रु.




# पुस्तके मिळण्याची ठिकाणे

**नामवंतांनी सुचवलेली पुस्तके आपण खालील दुकानांमधून मिळवू शकता. किंवा सदर प्रकाशन संस्थेकडेही मागणी करू शकता. यापुढील दोन अंकातून अशा निवडक पुस्तकांची माहिती आम्ही देणार आहोत. हे सर्व अंक संग्रही ठेवा व निवडक पुस्तकांची अवश्य मागणी नोंदवा.**

## पुणे

**रसिक साहित्य,**अप्पा बळवंत चौक,पुणे ४११ ००२फोन नं. ४४५११२९
**श्री लेखन वाचन भांडार,**१००४, बुधवार पेठ,पुणे ४११ ००२.फोन नं. ४४७४४७९
**पाटील इंटरप्रायझेस,**४९७,गजानन चैतन्य,पत्र्या मारुतीमंदिराजवळ, नारायण पेठ,पुणे ४११ ०३०.फोन नं. ४४८७६२९
**शुभम साहित्य,**६६६, नारायण पेठ,महाराष्ट्र होजिअरीजवळ,अप्पा बळवंत चौक पुणे ४११ ००२.फोन नं. ४४७४३२२

## मुंबई

**आयडियल पुस्तक त्रिवेणी,**छबीलदास रोड,दादर मुंबई २८.फोन नं. २४३०४२५४
**मॅजेस्टिक एजन्सीज,**विष्णु निवास, टिळकपुलाजवळ,सेनापती बापट मार्ग,दादर, मुंबई २८. फोन नं. २४३०५९१४
**जवाहर बुक डेपो,**१९/बी, श्रद्धानंद रोड, विलेपार्ले (पू) मुंबई ५ फोन नं. २६१४८७३५

## नासिक

**राहुल बुक सेंटर,**नेहरू गार्डन,शॉपिंग सेंटर,नाशिक ४२२००१.फोन नं. ५९९६०
**ज्योती स्टोअर्स,**जीवनछाया,मुरकुटे कॉलनी,गंगापूर रोड नाशिक फोन नं. ५०४०२६

## कोल्हापूर

**मेहता बुक सेलर्स,** ३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर फोन नं. ५२२३०४

## नागपूर

**साहित्य प्रसार केंद्र,**नेहरू मार्ग, सीताबर्डी, नागपूर १२.फोन नं. ५२३७०२
**नागपूर पॉप्यूलर बुक स्टॉल,**पटवर्धन हायस्कूल समोर,सीताबर्डी, नागपूर १२. फोन नं. ५२४२७८

## नांदेड

**अभय पुस्तक भांडार,** भोरे कॉम्प्लेक्स,महावीर चौक,नांदेड ४३१ ६०१.फोन नं. ४०२६५

## औरंगाबाद

**विद्या बुक्स,** औरंगपुरा, औरंगाबाद ४३१००१.फोन नं. ३३७३७१

## लातूर

**भारतीय पुस्तकालय,** मेन रोड,लातूर ४१२ ५१२.फोन नं. ४८३८४
**गजानन बुक स्टॉल,** वडवळ नागनाथ,ता. चाकुर, लातूर फोन नं.४८३८४

## सांगली

**स्टुडण्टस बुक डेपो,** सराफबाझारसांगली ४१६ ४१६.फोन नं. ३७४२५०
**जी.आर.ताम्हणकर बुकसेलर्स,** सराफनाका,सांगली ४१६४१६.फोन नं. ३७३६०५
**रत्नाकर बुक स्टॉल,** हायस्कूल रोड,पोस्ट बॉक्स नं,१३,मिरज, सांगली ४१६४१० फोन नं. २२२५६४

## सोलापूर

**सरस्वती बुक डेपो,** नवी पेठ,सोलापूर ४१३००१.फोन नं. ६२६६३०
**कुंदूर बंधू पुस्तक भांडार,** ६३, नवी पेठ,सोलापूर ४१३ ००७ फोन नं. ६२६१५६

## अमरावती

**पॉप्यूलर बुक सेंटर,** झुनझुनवाला धर्मशाळाकॉटन मार्केट,अमरावती ४४४६०१ फोन नं. ५७३०८१

## अकोला

**मिहीर उद्योग केंद्र,** 'केशव अर्चना' गांधी चौक,अकोला ४४४००१.फोन नं. ४४२१३८

## प्रकाशने

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०, फोन नं. ४४७६९२४
**ज्योत्स्ना प्रकाशन,** ६१७, नारायण पेठ, पुणे-३०, फोन नं. ४४५१४५३
**पॉप्युलर प्रकाशन,** ३५ सी, पं. मदनमोहन मालवीय मार्ग, ताडदेव, मुंबई ३४. फोन नं. २४९४१६५६



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २००३
◆ वर्ष तिसरे
◆ अंक दुसरा

— *अनुक्रमणिका* —


**संपादकीय** - २
**साहित्यवार्ता** ६
**पुस्तक परिचय**
संभव असंभव : अनु. प्रमोद जोगळेकर २०
असे घडवा मुलांचे
व्यक्तिमत्त्व : डॉ. रमा मराठे २४
बंजाऱ्याचे घर : यशोधरा भोसले २८
**पुरस्कार** ३४
**संमेलने** ३९
**स्पर्धा निकाल** १९,२७, ३८



- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १५ रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी : ***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**


**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*